**"Education for Knowledge, Science and Culture"**

**- Shikshanmaharshi Dr. Bapuji Salunkhe**

Shri Swami Vivekanand Shikshan Sanstha's

Vivekanand College,

Kolhapur (Autonomous)

# INTRODUCTION TO ANCIENT INDIAN HISTORY

**By,**

**Dr. S. R. Kattimani**

**M.A., B.Ed., NET, Ph.D (History)**

**BJMS, MBA (H.R & Marketing)**

**(ACADEMIC YEAR- 2019-20)**

## प्राचीन भारताच्या इतिहासाची तोंडओळख

## SYLLABUS


| Chapter/ Content | Page no |
|---|---|
| **Module -1. प्राचीन भारताच्या इतिहासाची साधने**<br>अ. साधने -लिखित व अलिखित<br>ब. परकीय प्रवासी वृत्तांत<br>i. मेगॅस्थेनीस,<br>ii. फाहीयान,<br>iii. हुएनसॅग (युआन-च्वांग) | **2-24** |
| **Module - 2. प्रागैतिहास**<br>अ. संकल्पना -<br>i. प्रागैतिहास,<br>ii. आद्य इतिहास ,<br>iii. ऐतिहासिक कालखंड<br>ब. पुराश्मयुग व मध्याश्मयुग प्रमुख वैशिष्ट्ये<br>क. नवाश्मयुगीन संस्कृतीची प्रमुख वैशिष्ट्ये | **25- 39** |
| **Module - 3. आद्य इतिहास**<br>अ. प्रथम नागरीकरण (सिंधू संस्कृती) -<br>i. उगम<br>ii. नगररचना<br>ब. सामाजिक, आर्थिक व धार्मिक जीवन, मुद्रा, व्यापार, लिपी व 1aसाची कारणे<br>क. महाराष्ट्रातील ताम्रपाषाण संस्कृती - जोर्वे संस्कृती. | **40-54** |
| **Module - 4. ऐतिहासिक कालखंड**<br>अ. वेदिक व उत्तर वेदिक कालखंड -<br>सामाजिक, आर्थिक व धार्मिक जीवन, सभा व समिती<br>ब. द्वितीय नागरीकरण कारणे<br>क. राज्यांची निर्मिती, जनपद, महाजनपद, गणराज्य . | **55-74** |
| **Question Paper Pattern** | **75** |

# Module - 1. प्राचीन भारताच्या इतिहासाची साधने

**प्रास्तविक**:-

कोणत्याही देशाच्या उद्भवा मध्ये व विकासामध्ये तेथील भौगोलिक परिस्थितीचा प्रभाव असतो. भारताच्या उत्तरेला हिमालय पर्वत, दक्षिणेला हिंदी महासागर, पूर्वेला बंगालचा उपसागर, पश्चिमेला अरबी समुद्र आहे. त्यामुळे भारताला नैसर्गिक कवच व संरक्षण प्राप्त झाले आहे. याचा परिणाम भारतीयांच्या जीवनपद्धतीवर व इतिहासावर झाल्याचे दिसून येते. त्यामुळे भारतीय संस्कृती जगातल्या इतर संस्कृतीपेक्षा विभिन्न आहे.

प्राचीन भारतामध्ये कला, स्थापत्य, साहित्य, मंदिरे, लेण्या, मूर्ती व स्मारकांची निर्मिती मोठ्या प्रमाणावर झाली. ज्याद्वारे आपणास तत्कालीन इतिहासाची माहिती मिळते. लिपीच्या उद्धवभवा नंतर अनेक आलेख कोरण्यात आले. विसाव्या शतकात इतिहासाच्या सहाय्यकारी शास्त्रांच्या मदतीने अनेक भौतिक पुरावे उजेडात आले. ज्याद्वारे तत्कालीन इतिहास समजतो .

भारतामध्ये हिरोडोटस,पॉलीबस,लिव्ही, टेसीटस यासारखे इतिहासकार घडून गेले नाहीत, ही एक शोकांतिका म्हणावी लागेल .भारतीय साहित्यामध्ये वेद, पुराण, उपनिषद व तत्वज्ञाना संदर्भातील लिखाण आपल्याला पाहायला मिळते .परंतु सीझरच्या कॉमेंट्रीज, झेनोफोन च्या अँनाबासिस यासारखे वृत्तांत आपल्याकडे पाहायला मिळत नाहीत .भारतीय साहित्यामध्ये कालनिर्णय व वस्तुनिष्ठतेला महत्त्व दिल्याचे दिसून येत नाही , ज्यामुळे प्राचीन भारतीय इतिहास समजून घेताना अडचणी निर्माण होतात . प्राध्यापक सीइनबॉस व लांजीलॉस यांच्या मते ' साधने नाहीत तर इतिहास नाही 'यावरून साधनाचे महत्त्व समजून येते . (No Documents, No History)

**इतिहासाचा अर्थ :-**

इतिहास या संस्कृत शब्दाचा अर्थ असा आहे की, 'हे असे घडले' . अर्थात इति+ह+ आस , म्हणजे भूतकाळात घडून गेलेल्या सर्व घटनांचा समावेश इतिहासात होऊ शकेल . History इंग्रजी शब्द ग्रीक शब्द Istoria या शब्दापासून तयार झालेला आहे. Istoria म्हणजे चौकशी, संशोधन अथवा माहिती मिळवणे. मानवी संस्कृतीचे मूळ व मानवाच्या प्रगतीची व्यवस्थित पद्धतीने संकलित केलेली माहिती म्हणजे इतिहास होय. Geschichte या जर्मन भाषेतील शब्दाचा अर्थ आहे की, "गतकालीन घटनांचे तर्कशुद्ध व अर्थपूर्ण विवेचन करणे ."

History शब्दांचा सर्वप्रथम वापर इतिहासाचे जनक समजले जाणारे 'हिरोडोटस' यांनी केला. त्यांच्या मते, history म्हणजे जाणून घेणे अथवा ज्ञात होणे होय. गतकालीन मानवी जीवनातील घडामोडींचे वर्णन लिहिण्यासाठी या शब्दाचा वापर त्यांनी सर्वप्रथम केला.

हिरोडोटस च्या मते , "गतकाळातील अविस्मरणीय आणि महत्त्वाच्या घटनांचा शोध म्हणजे इतिहास होय." According to Herodotus, “History means an inquiry into interesting and memorable past events.”

E.H. कार यांच्या मते, "इतिहास म्हणजे भूतकाळ व वर्तमानकाळ यांच्यातील कधीही न संपणारा संवाद होय."

Edward Hallett Carr says that, “History is an unending dialougue between the past and the present.”

थाॅमस कार्लाइल यांच्या मते , "थोर व्यक्तींची चरित्रे म्हणजे इतिहास होय."

Thomas Carlyle says that, “History is nothing but biographies of great men.”

रॉबर्ट सीली यांच्या मते, "गतकालीन राजकारण व वर्तमानकालीन राजकारण म्हणजे भावी इतिहास होय."

John Robert Seeley says that, “History is past politics and present politics is future history.”

टाॅयन्बी यांच्या मते ,"इतिहास म्हणजे मानवी संस्कृतीचा उदय आणि ¹aस होय."

Arnold Joseph Toynbee defines, “All history is nothing but rise and fall of human civilization.”

**ऐतिहासिक संदर्भ साधनांचे महत्त्व -**

Prof. Barlosh च्या मते, इतिहासकार भूतकाळातील घटना आपल्या जवळ असणाऱ्या ज्ञानाच्या पुराव्याच्या आधारे लिहिण्याचा प्रयत्न करीत असतो. हा पुरावा म्हणजेच इतिहासाची साधने होत. ऐतिहासिक संशोधनाचे मूल्य हे त्या इतिहासकाराने कोणत्या प्रकारची साधने वापरली आहेत, त्यांच्यावर अवलंबून असते .मूलभूत साधने हीच इतिहास लेखनाची पायाभूत साधने असतात. म्हणूनच म्हटले जाते no documents no history.

ऐतिहासिक साधनांच्या आधारावरच इतिहासाची रचना अवलंबून असते, म्हणूनच ही साधने इतिहास कालीन विचारांची माहिती सांगणारी सूत्रे असतात. ऐतिहासिक साधने मुख्यतः दोन प्रकारचे असतात, लिखित व अलिखित. लिखित साधनांचे पुन्हा प्राथमिक व दुय्यम साधने असे दोन भाग पडतात. इतिहासाचे साधन म्हणून प्राथमिक , दुय्यम व अलिखित साधनांना कमी-अधिक प्रमाणात सारख्याच महत्त्वाचे स्थान आहे. ऐतिहासिक साधनांची आणखी एक वैशिष्ट्य असे की सर्व साधने परिपूर्णपणे कधीच उपलब्ध होऊ शकत नाही.

**प्राथमिक साधने :-**

ज्यावेळी एखादी घटना घडत असते तेव्हा एखाद्या व्यक्तीने ती घटना जर स्वतःच्या डोळ्याने पाहिले असेल, तर त्यापासून निर्माण होणाऱ्या साधनाला प्राथमिक साधन असे म्हणतात. प्राथमिक साधन हे मूलभूत स्वरूपात , कच्चा अवस्थेत व अपूर्ण अवस्थेमध्ये असते. उदाहरणार्थ. एखादे मोडी कागदपत्र हे कितीही अव्वल दर्जाचे साधन मानले तरी जोपर्यंत संशोधक त्याच्यावर शास्त्रीय प्रक्रिया करीत नाही, तोपर्यंत ते साधन जरी प्राथमिक मानले तरी त्याला प्राथमिक साधन म्हणता येत नाही .प्राथमिक साधनांचे वैशिष्ट्य असे असते की संशोधकाला ते अर्थपूर्ण वाटले पाहिजे.


**दुय्यम साधने :-**

दुय्यम या शब्दावरून अशा प्रकारच्या साधनांचे स्वरूप मुळातच दुय्यम असते, असे आपल्या लक्षात येईल. एखादी घटना घडून गेल्यानंतर काही काळाने जेव्हा ती घटना कागदावर उतरवून ठेवली जाते , तेव्हा अशा साधनाला दुय्यम साधने असे म्हणतात. मुळातच या साधनांचे वैशिष्ट्य असे की घटना घडून गेल्यानंतर काही काळाने त्याची नोंद केलेली असते , मानवी स्मरणशक्तीचा विचार केला असता घटनांचा काही तपशील विसरला असण्याची शक्यता असते. म्हणूनच अशा साधनांमध्ये प्रार्थमिक साधनांचा तंतोतंतपणा येत नाही .

**प्राचीन भारतीय इतिहासाची वाङमयीन साधने:-**

प्राचीन भारतीयांनी सुसंगत ऐतिहासिक माहिती लिहून ठेवण्याकडे फारसे लक्ष दिले नाही. त्यामुळे परदेशाप्रमाणे भारतात इतिहास ग्रंथ निर्माण होऊ शकले नाहीत, असे असले तरीही या काळातील धार्मिक व धर्मातीत अशा साहित्यिक साधनांद्वारे आपल्याला तत्कालीन समाजाची सामाजिक, राजकीय, आर्थिक, धार्मिक व सांस्कृतिक परिस्थितीचे आकलन या साहित्यातून होते . प्राचीन भारतीय इतिहासाच्या वाङमयीन साधनाची विभागणी भारतीय व अभारतीय (परकीय) साहित्यिकांच्या द्वारे परकीय भाषेतील साधने असे वर्गीकरण करता येते. भारतीय भाषेतील साधने हिंदू, बौद्ध, जैन व संगम साहित्य अशा पद्धतीने करता येते.

वाङमयीन  साधनांचे प्रमुख तीन प्रकार पडतात:-  धार्मिक वाङमय, ल०किक   वाङमय व परकीय प्रवासी वृत्तान्त




धार्मिक वाङमयाचा हिंदू वाङमय, बौद्ध वाङमय, जैन वाङमय  असे प्रकार पडतात.

**अ)  हिंदू वाङमय**

हिंदू वाङमयाचा श्रुती आणि स्मृती अशा दोन गटात विभागणी करता येईल. ब्राह्मणे ,आरण्यके ,उपनिषदे यांना **श्रुती** असे म्हटले जाते . श्रुती म्हणजे ऐकुन  पिढ्यान पिढ्या जतन केलेले किंवा सारख्या पद्धतीने पाठांतराने एका पिढीकडून दुसऱ्या पिढीकडे हस्तांतरित केलेली वाङमय  होय. श्रवण करून लिहिलेल्या ग्रंथांना 'श्रुती' म्हटले जाते. तर स्मृती म्हणजे आठवून लिहिले गेलेले वाङमय  होय. यामध्ये धर्मशास्त्र, अर्थशास्त्र व महाकाव्य रामायण महाभारत यांचा समावेश होतो.

**1.   वेद :-**

आर्याच्या जीवनसंस्कृती ची सर्व माहिती आपणास वेदा वरून होते . वेद हे आर्यांचे प्राचीन ग्रंथ आहेत. वेदांना जगातील सर्व वांग्मय यांमध्ये श्रेष्ठ स्थान देण्यात आले . वेद हा शब्द या मूळ धातू पासून तयार झाला. वेद म्हणजे ज्ञान आणि  विद म्हणजे जाणणे.  वेद हे अपौरुषेय मानले जातात. पुराणात वेद हे ईश्वराचे निश्वसित असल्याचे म्हटले आहे . हिंदू संस्कृती आणि धर्माचा आधार वेद आहे.  वेद हे अनेक शतकात विकसित झाले आहे .  वेद  हे पिढ्यान पिढ्या मुखोद्गत शतकानुशतक टिकवले आहे.

**i.   <u>ऋग्वेद :-</u>**

ऋग्वेद हा आर्यांची माहिती देणारा पहिला ग्रंथ आहे. ऋग्वेदाची 10 मंडले 1028 सुक्ते , 10552 मंत्र देवतांना  आहेत. मुख्यत्वे वरुण , इंद्र , अग्नी,   रुद्र,   उषा आणि विविध निसर्ग देवतांची आराधना करण्यासाठी ऋग्वेदाची निर्मिती झाली. ऋग्वेदातील मंत्राना 'ऋचा' असे म्हणतात .अनेक ऋचांचे मिळून एक सूक्त बनते . दहा मंडळांपैकी दोन ते सात मंडले प्राचीनतम असून .  1 , 9 आणि 10 या मंडळांचा नंतर समावेश करण्यात आला आहे .

**ii.   <u>यजुर्वेद :-</u>**

यजुस म्हणजे यज्ञ करणे. शास्त्रोक्त पद्धतीने यज्ञविधी कसा करावा व यज्ञात कोणते मंत्र म्हणावेत ही माहिती यजुर्वेदात दिली आहे . यजुर्वेदाच्या अनेक शाखांपैकी फारच थोड्या शाखा आज उपलब्ध आहेत. यजुर्वेदाचे कृष्ण आणि शुक्ल यजुर्वेद असे दोन भाग पडतात .ऋग्वेदातील यज्ञाचे साधे व सोज्वळ स्वरूप जाऊन यजुर्वेदातील यज्ञात यांत्रिकपणा व ठोकळेबाजपणा आला. ऋग्वेदातील देवतेचे महत्त्व कमी होऊन यज्ञात भाग घेणाऱ्या पुरोहितांना महत्त्व प्राप्त झाले .

**iii.   <u>सामवेद:-</u>**

सामन या शब्दाचा अर्थ गायन असा आहे . सामवेदात 1810 ऋचा आहेत. यज्ञप्रसंगी तालासुरात मंत्र म्हणण्याच्या 36 पद्धती त्यात सांगितलेल्या आहेत. भारतीय संगीतातील सप्तसुरांची माहिती या वेदात आहे . सामवेदाचे पूर्वार्चिक आणि

उत्तरार्चिक असे दोन भाग पडतात . सामवेदामुळे यज्ञकर्मास संगीताची जोड देण्यात आली. यज्ञाच्या वेळी सामांचे गायन करणार्या पुरोहितास ' उद्गाता 'असे म्हणतात .

iv. **अथर्ववेद**:-

वेदाचे मूळ नाव ' अथर्वांगीरस ' हे होते . अथर्ववेदाचे दोन भाग पडतात त्यांना अथर्वक् व अंगिरस असे म्हणतात . अथर्वक हे मंत्र शुभकारक असतात. तर अंगीरसाचे मंत्र पीडाकारक आहेत. अथर्ववेदात एकूण 20 कांडे आहेत. जारण, मारण, तारण, वशीकरण इत्यादीसंबंधी मंत्र आणि तंत्र यात सांगितले आहेत. लोक भ्रम आणि समजुती समजावून घेण्यासाठी अथर्ववेद उपयुक्त ठरतो. अथर्ववेदातील रोग निवारक मंत्र आणि औषधे आयुर्वेदाची सुरुवात दर्शवितात. तर वशीकरण विधी आपणास कामशास्त्राची चाहूल दाखवितात. अनेक धर्मविधी, गृहस्थाश्रमाची कर्तव्ये व सामाजिक जीवनाचे वर्णन अथर्ववेदात आढळते.

**2. उपवेद :-**

आयुर्वेद ,धनुर्वेद ,गंधर्ववेद व शिल्पवेद ही चार उपवेद आहेत. आयुर्वेद हा ऋग्वेदाचा उपवेद असुन याचा निर्माता धन्वंतरी हा आहे. आयुर्वेदासंबंधी च्या ग्रंथांमध्ये चरक संहिता, सुश्रुत संहिता, वाग्भट संहितेचा समावेश होतो. धनुर्वेद हा यजुर्वेदाचा उपवेद असून यामध्ये चार पुरुषार्थ, कर्तव्ये, कार्य ,शस्त्रविद्या रामायण, महाभारत यांचा समावेश होतो. गंधर्ववेद हा सामवेदाचा उपवेद असून यामध्ये संगीत व मंत्रासंबंधीची माहिती मिळते.यामध्ये 1810 ऋचा आहेत. स्थापत्यवेद म्हणजेच शिल्पवेद हा अथर्ववेदाचा उपवेद असुन यामध्ये चौसष्ट कलांची माहिती मिळते. अथर्ववेदामध्ये 6000 ऋचा आहेत.

**3. उपनिषदे :-**

उपनिषद हा शब्द उप+ नि + सद या शब्दांनी मिळून बनला आहे. उपनिषदांचा अर्थ गूढ स्थळी बसलेले , सारभूत असे तत्त्व, ज्ञानप्राप्तीसाठी गुरुजवळ बसणे, आणि ब्रह्मज्ञानाचे सिद्धांत असा आहे. उपनिषदे हे दार्शनिक ग्रंथ असून त्यामध्ये आत्मा, ब्रह्म व सृष्टीच्या स्वरूपाचे वर्णन करण्यात आले आहे . उपनिषदे हा वेदांचा अंतिम भाग ठरतो. त्यामुळेच उपनिषदे व आरण्यकास वेदांत म्हणून संबोधले जाते . उपनिषदे वेदांत दर्शनाची साधने आहेत.

उपनिषदाचा अर्थ गोपनीय किंवा ब्रह्मज्ञानाचा म्हणजे जगताच्या मूळ कारणाविषयीचा सिद्धांत असा आहे . गुरूजवळ नम्रतापूर्वक बसुन , आत्म्यास ब्रह्म रुपात प्रतिष्ठित करणारे ज्ञान प्राप्त करणे, यालाच उपनिषद म्हणतात. उपनिषदांतील तत्त्वज्ञानात आत्मनिरीक्षण, तात्विक ज्ञान , मृत्यू , पुनर्जन्म, अमरत्व प्राप्तीचे विचार , वैराग्य अर्थात संन्यास या गोष्टींचा समावेश होतो. उपनिषदांची संख्या 108 मानली जाते. 108 उपनिषदांपैकी ईश, केन, कठ, प्रश्न, मुंड, छांदोग्य ,मांण्डुक्य, तैतरीय, ऐतरेय, बृहदारण्यक, कौषीतकी , श्वेताश्वतर उपनिषद अतिप्राचीन, प्रामाणिक व विशेष श्रद्धा पात्र मानले जातात. उपनिषदांच्या रचनेचा काळ इसवीसन पूर्व 800 ते इ.स.५०० मानला जातो .

**4. वेदांगे** -

वेदांचे व्यवस्थित ज्ञान प्राप्त करण्यासाठी किंवा वेदांचा अर्थ व्यवस्थित समजण्यासाठी कालांतराने सहा विषयांची रचना करण्यात आली त्यास वेदांगे म्हणून ओळखले जाते. यामध्ये शिक्षण, कल्प, व्याकरण, ज्योतिष, छंद व निरुक्त यांचा समावेश आहे.

**5.ब्राह्मण ग्रंथ:-**

ब्राह्मण ग्रंथामध्ये संहितेच्या ऋचांची व्याख्या शास्त्रोक्त आणि सैद्धांतिक दृष्टिकोणातून केली.प्रत्येक संहितेस वेगवेगळे ब्राह्मणग्रंथ जोडलेले दिसतात. या ग्रंथात वैदिक मंत्राचा अर्थ आणि विविध नियमांचे स्पष्टीकरण केलेले आहे. ऋषींनी वेदांवरील केलेले भाष्य म्हणजे ब्राह्मण ग्रंथ होय. यज्ञ विधीचे स्पष्टीकरणही ब्राह्मण ग्रंथात आढळते .

**6. आरण्यके:-**

**आरण्यके** ब्राह्मण ग्रंथाचा अंतिम भाग म्हणून ओळखला जातो. भाषा व शैलीच्या दृष्टीने आरण्यके ब्राह्मणग्रंथाशी मिळते जुळते आहेत . वेदांच्या भागावरील मंत्र एकांतवासात अरण्यात शिकावे लागत असल्यामुळे त्यांना आरण्यके या नावाने ओळखले जाते.आरण्यकात संहिता या मूळ ग्रंथाच्या रहस्यमय अंगाचे वर्णन केले आहे . आरण्यकांना इतके पवित्र मानले जात होते की याचे मनन , चिंतन पठण - पाठण हे आरण्य किंवा वनाशिवाय इतर ठिकाणी करणे निषिद्ध होते .वानप्रस्थाश्रमीयांना अध्यात्म चिंतनासाठी हे ग्रंथ उपयोगी होते .

**7. सूत्र ग्रंथ :-**

कमीत कमी शब्दात अधिकाधिक माहिती देण्याचे काम सुत्र वाङमय करते .सूत्र वाङमयांना ' वेदांगे' या नावानेही ओळखले जाते. सूत्राचे स्वरूप लहान असल्यामुळे त्यांचे स्मरण करण्यास सोपे होते. आर्यांच्या तत्कालीन समाजातील धार्मिक आणि सामाजिक विधिनिषेध लहान लहान सूत्रांमध्ये संघटित आणि संकलित केले गेले . सूत्रांची भाषा गद्य आणि पद्यामध्ये आहे. सर्वात प्राचीन सूत्रग्रंथ म्हणजे ' कल्पसूत्र' होय.

**8. स्मृतिग्रंथ:-**

प्राचीन भारतीय इतिहासाच्या साधनात स्मृती साहित्यास महत्त्वाचे स्थान आहे . स्मृती या शब्दाचा अर्थ स्मरण किंवा आठवण असा आहे. विशिष्ट अर्थाने संस्कारांमधून उत्पन्न होणारे ज्ञान स्मृतिग्रंथ मानले आहे. त्यामुळेच आपली नीती व धर्माच्या रचनेसाठी या ग्रंथांची रचना झाली त्यालाच स्मृतिग्रंथ म्हणतात. आर्यांच्या जीवनाच्या नियमांचा संग्रह या स्मृतीमध्ये आहे . 'मनुस्मृति' ही जगातील पहिली विधी नियमांची पुस्तिका आहे. प्रमुख २० स्मृती आहेत. स्मृतींमध्ये मनुष्य समाजाचे संघटन पारस्परिक व्यवहारांचे वर्णन केले आहे. सर्व स्मृतींमध्ये मनुस्मृती, याज्ञवल्क्यस्मृती, नारदस्मृति, बृहस्पतिस्मृति प्रसिद्ध आहेत .

9. **महाकाव्य** :-

रामायण व महाभारत या दोन भारतीय महाकाव्यांनी भारतीय इतिहास परंपरेस गौरवशाली बनविले . या दोन्ही महाकाव्यांवरुन तत्कालीन आदर्श समाज, समाजातील रीतीरिवाज, धार्मिक जीवन, राजनीति, व्यापार-वाणिज्य , युद्ध संधी आणि जीवनाच्या प्रत्येक आदर्शमय पैलूची माहिती मिळते. त्यामुळे ही दोन महाकाव्ये प्राचीन भारतीय इतिहास व संस्कृतीच्या अध्ययनाची महत्त्वाची साधने ठरतात.

**रामायण** :-

वाल्मिकीने लिहिलेले रामायण हे भारतीय साहित्यासाठी एक प्रेरणा साधन ठरले. रामायणाने केवळ काव्यशैलीचा आदर्श प्रस्तुत केला नाही, तर नैतिकता व चारित्र्याचा आदर्शही प्रस्तुत केला. आर्य संस्कृतीच्या प्रत्येक प्रथेची माहिती देणारे रामायण हे प्राचीन भारतीय इतिहासाचे महत्त्वपूर्ण साधन आहे. रामायण या ग्रंथावरून तत्कालीन समाजातील बंधुप्रेम व पत्नी प्रेमाची कल्पना येते .

रामायण हा ग्रंथ संस्कृत साहित्याचे आदिकाव्य व त्याचा रचनाकार वाल्मिकी हा आदिकवी ठरतो . संपूर्ण भारतात हा धर्म ग्रंथ पूज्य मानला जातो. वाल्मिकी रामायणात ७ कांड असून चोवीस हजार श्लोक आहेत . त्यामुळेच या ग्रंथात 'चतुविशती साहस्री संहिता' म्हटले गेले आहे. रामायणाचा प्रसार भारताशिवाय जावा-सुमात्रा, बाली, सयाम व इतर देशातही मोठ्या प्रमाणावर झाला आहे .

**<u>महाभारत</u>** :-

जगातील संपूर्ण साहित्यात महाभारत हे आर्ष्यकाव्य प्रसिद्ध आहे. कृष्णद्वैपायन व्यास यांनी महाभारताची रचना केली . ग्रंथ रचनेसाठी त्यांना तीन वर्षे परिश्रम घ्यावे लागले . वर्तमान महाभारतात एक लाख श्लोक प्राप्त होतात . त्यामुळे त्यास 'शतसाहस्री संहिता' असे म्हटले जाते. महाभारतात १८ खंड आहेत. त्यांना पर्व असे म्हणतात. महाभारताची कथा चंद्र वंशाच्या इतिहासापासून सुरू होते व पांडवांमध्ये झालेल्या 18 दिवसाच्या युद्धानंतर संपते. या युद्धात संपूर्ण भारतातील विभिन्न क्षत्रिय वंशांनी सहभाग घेतला होता. युधिष्ठाराचा राज्याभिषेक व पांडवांच्या स्वर्गारोहणाने महाभारताच्या कथेचा शेवट होतो. या कथेमध्ये देवता, राजा व ऋषींशी संबंधित कथा तसेच सृष्टीची निर्मिती , तत्वज्ञान , धर्म व वर्णाश्रम व्यवस्थेचे ही वर्णन त्यामध्ये आढळते . याशिवाय शकुंतला, राम , सावित्री , नल, मत्स्य व शिबी यांच्या विभिन्न कथांचे वर्णन त्यामध्ये केलेले आहे.

श्रीमद् भगवद् गीता हा ग्रंथ महाभारताच्या भिष्मपर्वाचाच एक अंश आहे. या महाकाव्याचा रचनाकाळ निश्चित सांगता येत नाही. महाभारतातील तत्कालीन सामाजिक, आर्थिक, राजकीय व सांस्कृतिक माहिती चे वर्णन केले आहे . महाभारतास ‘पाचवा वेद’ असे म्हटले जाते . हा ग्रंथ म्हणजे विश्वकोश, इतिहास व धर्मग्रंथ सुद्धा आहे. हिंदू धर्माचे विविध चित्रण महाभारताशिवाय मिळत नाही. त्यामुळे महाभारताचे महत्त्व नाकारता येत नाही .

प्राचीन धार्मिक व दार्शनिक साहित्यात त्याचे स्थान महत्त्वाचे आहे .महाभारत हे रक्तसंबंध आणि कर्तव्य यांच्यातील संघर्ष प्रस्तुत करून कर्तव्याचा विजय प्रदर्शित करते. गीतेमध्ये निष्काम कर्म, स्वधर्म व भक्ती या तीन गोष्टींवर अधिक भर दिला आहे.

**10. पुराण:-**

पुराण या शब्दाचा अर्थ प्राचीन किंवा जुना, पुराणा असा आहे. प्राचीन कथांचे संकलन या ग्रंथात असल्याने या ग्रंथांना ‘पुराण’ असे म्हटले गेले . पुराण म्हणजे पुरातन आख्यान होय . पुराणांचा संग्रह करता लोमहर्ष ऋषी व त्यांचा पुत्र उग्रश्रवा हे होत. वैदिक साहित्यात पुराणाचा संबंध इतिहासाशी जोडला आहे . पुराणांचा रचना काळ निश्चित करता आला नसला तरी विभिन्न अंतरंग व बाह्य प्रमाणांच्या आधारावर त्यांची रचना इ.सन पूर्व 6०० ते इ. स. 500 या काळात झाली असावी असे निश्चित सांगता येते. पुराणांची संख्या 18 असून उपपुराणेही अठरा आहेत. पुराणांमध्ये आचार , आश्रमधर्म, ब्राह्मणांची कर्तव्ये, दान, गोत्र, कर्मविपाक, नीती , संस्कार, प्रायश्चित, स्त्रीधर्म , वर्णधर्म, विवाह व व्यवहार यासारख्या अनेक विषयांवर सविस्तरपणे चर्चा केली आहे .

पुराणे ही इतिहासाची महत्त्वाची वाङमयीनयीन साधने आहेत. ऐतिहासिक दृष्ट्या मत्स्य , वायु , विष्णू ,ब्रह्मांड व भागवत ही पुराणे महत्त्वाची आहेत . पुराणांची रचना केव्हा झाली याबाबत मतभेद असले तरी प्रत्येक पुराणांचा कालखंड वेगळा आहे हे निश्चित आहे. भारताच्या इतिहासाची प्रारंभिक राजकीय माहिती आपणास पुराणांवरून मिळते .अनेक राजवंशाची क्रमवार माहिती पुराणांमध्ये सापडते. गरुड, अग्नी व नारद ही पुराणे संस्कृत साहित्यातील कला व शास्त्रे यासंबंधी माहिती देतात .वायू व ब्रह्मांड ही पुराणे कलियुगातील वंशावळीची माहिती देतात. गुप्तवंशापर्यंतचा राजकीय इतिहास लिहिण्यासाठी पुराणांची मदत

होते . अनेक राजांची चरित्रे सुद्धा पुराणात दिलेली आहेत. धार्मिक स्थितीची माहितीही पुराणात आढळते . सातवाहन राजांची वंशावळ आणि त्याचा कालखंड मत्स्य, वायु ,भागवत, विष्णू व ब्रह्मांड या पाच पुराणांनी दिली आहे . दिलेल्या माहितीमध्ये एकवाक्यता नसली तरी पुराणांचे महत्त्व नाकारता येत नाही. औरंगाबादजवळील देवगिरीचे वर्णन पुराणांत आढळते. पुराणात अश्मक, मुलक व कुंतल या जनपदाचा उल्लेख आलेला आहे .

**ब) जैन साहित्य :-**

जैन साहित्यामुळे भारताच्या प्राचीन इतिहासावर प्रकाश पडतो. जैन धर्मीय साहित्यास 'आगम' म्हणतात. एकूण बारा आगम आहेत. जैन साहित्यात 12 अंग, 12 उपांग, 10 प्रकीर्ण , 6 छेद, सूत्र , नंदीसूत्र व मूलसूत्र महत्त्वाची आहेत. जैन आगमांमध्ये बारा अंगास महत्त्वाचे स्थान आहे . त्यामध्ये जैन भिक्षूंचे आचारनियम , त्यांची जीवनपद्धती , विविध प्रवचन, उपदेश, महावीरांचे जीवन व कार्य, त्यांची शिकवणूक, उपासकांचे विधिनियम, भिक्षूंची निर्माण प्राप्ती आणि कर्मफळ इत्यादी विषयांवर प्रकाश टाकण्यात आला आहे. जैन साहित्यात प्रबंध चिंतामणी व कालकाचार्यांचे कथानक या ग्रंथांमध्ये पैठणचे वर्णन आले आहे. 'भगवती सूत्रात' सोळा महाजन पदाचा उल्लेख आहे . याशिवाय ब्रहतकल्पसूत्रभाष्य, आचारांगसूत्र, कथाकोष, कल्पप्रदीप व ब्रहतकल्पसूत्रभाष्य हे जैन साहित्यसुद्धा प्राचीन भारताच्या इतिहासावर प्रकाश टाकते. जैन आचार्य हेमचंद्र द्वारा लिखित ग्रंथ परिशिष्टपर्व, पुरुष चरित्र व महावीर चरित्र इत्यादी ग्रंथ होत. भद्रबाहू द्वारा रचित 'भद्रबाहू चरित्रा' वरून चंद्रगुप्ताच्या जीवनावर प्रकाश पडतो.

**क) बौद्ध साहित्य :-**

प्राचीन भारतीय इतिहासाच्या साधनात बौद्ध धर्मीय ग्रंथांनी महत्त्वाची भर टाकली आहे. दीपवंश, महावंश, त्रिपिटक, महावस्तु , ललितविस्तार, मिलिंद पन्हो, बुद्धचरीत , सौदरानंद, अभिधम्मपिटक, दीघनिकाय, मज्जिमनिकाय, संयुक्त निकाय, अंगुत्तर निकाय व दिव्यावदान या बौद्ध ग्रंथात तत्कालीन सामाजिक, राजकीय , धार्मिक, आर्थिक स्थितीवर प्रकाश टाकला आहे .

दिव्यावदान या ग्रंथात अशोकाच्या उत्तराधिकार्यापासून पुष्यमित्र शुंगापर्यंत होऊन गेलेल्या राजांची माहिती सापडते. भारतीय इतिहासाचे महत्वाचे साधन म्हणून बौध्द साहित्याकडे पाहिले जाते. प्राचीन काळात भारतात सोळा महाजनपदे होती. बौध्द साहित्यांमध्ये त्यांचा उल्लेख षोडसमहाजनपद या नावाने केला आहे . सुत्तनिपात व अंगुत्तरनिकाय या बौद्ध ग्रंथांमध्ये मराठवाड्यात असलेल्या अश्मक या जनपदाचा उल्लेख आहे . महावंश या ग्रंथात दक्षिणपथातील महारट्ट प्रदेशाचाही उल्लेख आहे. सातवाहन काळात होऊन गेलेले नागार्जुन यांनी माध्यमिककारिका हा ग्रंथ लिहिला तर आर्यदेव यांनी 'चतु:शतक' हा ग्रंथ लिहिला. या ग्रंथांवरून सातवाहनकालीन समाज, धर्म व संस्कृतीची माहिती मिळते .

त्रिपिटक बौद्ध धर्मातील जुने साहित्यिक स्त्रोत होत. त्रिपिटक म्हणजे पेटार्यांचा समूह. ज्यामध्ये सुत्तपिटक, विनयपिटक व अभिधम्म पिटक यांचा समावेश होतो. सुत्तपिटकामध्ये बुद्धाचे मूळ विचार आणि उपदेश आहेत. विनयपिटकात बौद्ध संघातील अनुयायांसाठी नियम आहेत. अभिधम्मपिटकाची रचना बुध्दांच्या निर्वाणानंतर झाली. दीपवंश व महावंश हे लंकेतील पालि भाषिक ग्रंथ बौद्ध धर्मावर प्रकाश टाकतात. मिलिंदपन्हो हा ग्रंथ युनानी शासक व मिनँडरवर प्रकाश टाकतो. महावस्तु , ललित विस्तार ,बुद्धचरितम इ. ग्रंथ बौद्ध धर्माबद्दल माहिती देतात .

**ड) संगम साहित्य (तामिळ वाङमय):-**

द्रविड भाषा समूहात तमिळ भाषा ही अत्यंत पुरातन होय. या भाषेतील अतिप्राचीन वाङमयाचा संबंध संगम नावाच्या साहित्य परिषदांची जोडला जातो म्हणून या साहित्याला संगम साहित्य असे म्हणतात. इसवी सन पूर्व 500 ते इसवी सन 500 या कालखंडामध्ये एकूण तीन संगम परिषदा पांड्य राजांच्या काळामध्ये झाल्या. प्रत्येक परीषदांमध्ये अनेक कवी आणि पंडित

यांच्या वांग्मयाचा समावेश केलेला आहे. पहिल्या दोन संगम परिषदा अगस्त्य मुनीच्या अध्यक्षतेखाली मदुराई येथे झाल्या तर तिसरी परिषद नक्कीरर यांच्या अध्यक्षतेखाली झाली . संघमसंहिता ही प्राचीन समाजात लोकप्रिय असणार्या विषयांवरील वेच्यांचा संग्रह आहे. तोल्कापीयर, वल्लुवर, इलंगोअडीगल हे काही संगम साहित्यिक होत. अनेक कवी व भाट यांची कवने संघम् काव्यसंग्रहात समाविष्ट केलेली आहेत. यामध्ये प्राचीनतम स्तरातील एट्टुतोगाई आणि नंतरच्या काळातील पट्टुपट्टु ग्रंथांचा समावेश होतो. त्यात नंतर भर पडली ती तमिळ व्याकरणावरील तोल्काप्पियम आणि नीतिपरग्रंथ तिरूक्कुरल यांची मणीमेखलाई हे संगम साहित्यातील प्रसिद्ध ग्रंथ आहे.

**धर्मनिरपेक्ष साहित्य :-**

प्राचीन भारतात धर्मनिरपेक्ष साहित्याचा मोठ्या प्रमाणात विकास झाला. प्राचीन काळात विविध प्रकारचे धर्मनिरपेक्ष ग्रंथ तयार झाले .प्राचीन भारताचा इतिहास रेखाटणे किंवा सांगणे हा या साहित्याचा हेतू नव्हता, परंतु अशा साहित्यामधून इतिहास लिहिण्यासाठी आवश्यक असणाऱ्या घटना, गोष्टी आणि प्रसंग वेचून घ्यावे लागतात. धर्मनिरपेक्ष साहित्यातून आपणास प्राचीन भारतातील सामाजिक, धार्मिक, आर्थिक व राजकीय परिस्थितीची माहिती मिळते.

i. **<u>कौटिल्याचे अर्थशास्त्र:-</u>**

चंद्रगुप्ताचा प्रधानमंत्री कौटिल्य / विष्णुगुप्त / चाणक्य याने मौर्य काळातच अर्थशास्त्र हा महत्त्वपूर्ण ग्रंथ लिहिला .काही इतिहासकारांच्या मते अर्थशास्त्र मौर्यकाळात लिहिला गेला नाही, याचे खंडन करताना रोमिला थापर यांनी म्हटले की, "अर्थशास्त्र हा ग्रंथ चंद्रगुप्त मौर्य यांचा प्रधानमंत्री कौटिल्य यांनी मौर्य काळातच लिहिला. अर्थशास्त्र आणि अशोकाचे अभिलेख यामधील शब्द प्रयोगांमध्ये समानता दिसून येते." अर्थशास्त्र या ग्रंथावरून मौर्यांचे प्रशासन , सामाजिक, धार्मिक व आर्थिक परिस्थितीची माहिती होते .

कौटिल्य हा मौर्य प्रशासनातील मंत्री व महान राजनीतिज्ञ होता. तंजावरच्या सरस्वती महालात (तामिळनाडू) येथे डॉ. श्यामाशास्त्रींना अर्थशास्त्राची विश्वसनीय प्रत 1904 साली उपलब्ध झाली. अर्थशास्त्राचा निर्माता कोण याविषयी विद्वानांत मतभेद आहेत . तथापि, अर्थशास्त्रातील विषय,भाषा, रचना व ग्रंथ कर्त्याची भूमिका लक्षात घेऊन विष्णुगुप्त, चाणक्य व कौटिल्य ही एकाच व्यक्तीची नावे असून मौर्यांचा मंत्री व अर्थशास्त्राचा लेखक होता ही बाब आता बहुमान्य झालेली आहे. ग्रंथकर्त्याचा नामनिर्देश करण्याची प्रथा प्राचीनकाळी फारशी रुढ नसल्याने अर्थशास्त्रात चाणक्याचा उल्लेख येत नाही. सम्राटाचा उल्लेख न करता मौर्यकालीन प्रशासन, विविध राज्य, साम्राज्यविस्तार व जीवनपद्धतीचे असंख्य अस्पष्ट संदर्भ अर्थशास्त्रात आढळतात .या ग्रंथात 15 विभाग 180 प्रकरणे आणि 6000 श्लोक असून रचना संस्कृतमध्ये केलेली आहे . मौर्यकालीन इतिहासाबरोबरच प्राचीन भारतीय राजनीति , धर्मकारण, राजकारण, अर्थकारण व समाजस्थितीचे दर्शन घडवणारा अर्थशास्त्र हा अजोड ग्रंथ आहे. यामध्ये पुढील विविध विषयांबाबतचे कथन केलेले आहे.

**<u>सप्तांग सिद्धांत:</u>**

अर्थशास्त्रात वर्णिलेला सप्तांग सिद्धांत हा वैशिष्ट्यपूर्ण आहे. राज्याच्या परिपूर्णतेसाठी जे सात घटक आवश्यक आहेत त्यांना सप्तांग असे म्हटले आहे . स्वामी, राष्ट्र , दुर्ग ,बल, कोष, व सुर्हद ही सप्तांगे आहेत . स्वामी म्हणजे राजा , अमात्य म्हणजे मंत्री व अधिकारी, राष्ट्र म्हणजे राज्य व भूप्रदेश, दुर्ग म्हणजे किल्ले व कोष म्हणजे खजिना होय. शेजारी मित्र राष्ट्रांना उद्देशून सुर्हद म्हटले आहे. अशा रीतीने राज्याचे सात घटक वर्णन करून यापैकी एखादा घटक दुर्बल असल्यास तो राज्य विनाशाला कारणीभूत ठरतो असा स्पष्ट इशारा दिलेला आहे. राजा हा राष्ट्राचा सर्वोच्च अधिकारी आहे .तो युद्ध ,कायदा, न्याय, धर्म पारंगत असला पाहिजे. त्याने सीमेपलीकडील राजास शत्रु समजावे. थोडक्यात, राजा हा जनकल्याणकारी, प्रजापालक,

तत्पर, जागरूक, मुत्सदी व राष्ट्र रक्षक असावा. एक आदर्श सम्राटाची लक्षणे अर्थशास्त्रात सांगितली आहेत. राज्याच्या अर्थव्यवस्थेचा तपशील अर्थशास्त्रात दिलेला आहे.

कठोर शिक्षापद्धतीची माहिती अर्थशास्त्रातून मिळते. शिक्षा संतुलित असाव्यात भयंकर शिक्षा देणारा राजा जुलमी बनतो व कमी शिक्षा देणाऱ्या राजावर लोकांचे दडपण निर्माण होते. म्हणून राजाने गुन्हा व गुन्हेगारीचे स्वरूप लक्षात घेऊन योग्य शिक्षा द्याव्यात. कौटिल्याने गुप्तहेर खात्याला असामान्य महत्त्व दिले होते.

**ii. <u>अष्टाध्यायी :-</u>**

या ग्रंथाची रचना पाणिनि यांनी केली असून यामध्ये आठ प्रकरणे आहेत . या आठ प्रकरणाच्या अंतर्गत 4000 सूत्रे आहेत. प्राचीन भारतीय भाषा, ज्ञान आणि शिक्षण पद्धतीची माहिती या ग्रंथांवरून आपणास प्राप्त होते. पाणिनीच्या अष्टाध्यायी यावरील टीका पतंजली यांनी आपल्या महाभाष्य या ग्रंथामध्ये केलेली आहे.

**iii. <u>गार्गी संहिता:-</u>**

या ग्रंथावरून भारतावरील यवन आक्रमणांची माहिती मिळते. या ग्रंथाचा रचनाकाल इसवी सनाचे पहिले शतक असा मानला जातो.

**iv. <u>नीतीसार:-</u>**

या ग्रंथाची रचना कामन्दक याने केली. या ग्रंथाची रचना चंद्रगुप्त दुसरा यांच्या काळात झाली असावी . हा ग्रंथ कौटिल्याचे अर्थशास्त्र या ग्रंथावर आधारित आहे ; कामन्दक यानेही या गोष्टीस मान्यता दिली आहे .तरीही हा ग्रंथ अर्थशास्त्रापेक्षा बराच भिन्न आहे . हा ग्रंथ गुप्तकालीन राज्यनीती आणि शासन व्यवस्थेचा अभ्यास करण्यासाठी उपयुक्त ठरतो.

**v. <u>कालिदास:-</u>**

संस्कृत साहित्यात कवी व नाटककार म्हणून कालिदास सर्वाधिक प्रसिद्ध आहे. गुप्त सम्राट चंद्रगुप्त –II म्हणजेच विक्रमादित्य याने कालिदासाला आपल्या दरबारात आश्रय दिला होता. कुमारगुप्त प्रथम व स्कंदगुप्त या राजांनीही त्याला आश्रय दिला होता . कालिदासाने अभिज्ञानशाकुंतलम , विक्रमोर्वशीय, मालविकाग्निमित्र , रघुवंश , मेघदूत व ऋतुसंहार या साहित्याची रचना केली.

**<u>मालविकाग्निमित्र</u>** :-

मालविकाग्निमित्र ही कालिदासाची प्रथम रचना असावी. त्याचे कथानक ऐतिहासिक नाही पण त्यामधील पात्रे ऐतिहासिक आहेत. या नाटकातील नायक पुष्यमित्र शुंगाचा पुत्र अग्निमित्र हा आहे. या नाटकावरून शुंग वंशातील राजा पुष्यमित्र शुंग व अग्निमित्र यांच्या कार्याची माहिती मिळते. तसेच तत्कालीन सामाजिक, धार्मिक व राजकीय स्थितीवरही प्रकाश टाकता येतो. याशिवाय पुष्यमित्र व यवन राजांच्यातील संघर्षाची ही माहिती मिळते.

**<u>विक्रमोवर्षीय</u>:-**

विक्रम वर्षीय या पाच अंकी नाटकाची रचना कालिदासाने केली. अप्सरा ऊर्वशी व राजा पुरुरवा यांच्यातील पारस्परिक प्रणयाची कथा हा या नाटकाचा विषय आहे .

**<u>अभिज्ञान शाकुंतल:-</u>**

कालिदासाने सात अंकात लिहीलेले अभिज्ञान शाकुंतलम हे नाटक सर्वश्रेष्ठ आहे. त्यास विश्व साहित्यातील सर्वश्रेष्ठ नाटक असे मानले जाते. चंद्रवंशी राजा दुष्यंत व महर्षी कण्व यांची कन्या शकुंतला यांचा मुग्ध प्रणय , गांधर्व विवाह, वियोग व पुनर्मिलन यांचे वर्णन हा या नाटकाचा प्रमुख विषय आहे.

**<u>मेघदूत:-</u>**

कालिदासाने मेघदूत या खंड काव्याची रचना संस्कृत भाषेत केली. या काव्याचे पूर्वमेघ व उत्तर मेघ असे दोन भाग आहेत. या दोन भागांचे मिळून मंदाक्रांता छंदामध्ये 121 पदे आहेत . याची कथा अशी आहे. कुबेराच्या शापामुळे अलका नगरीतून एका वर्षासाठी एक निर्वासित रामगिरी पर्वतावर राहतो. पावसाळ्याच्या प्रारंभी मेघाकडे पाहून आपल्या प्रिय पत्नीच्या आठवणीने व्याकूळ होतो आणि मेघाद्वारा आपल्या प्रिय पत्नीस संदेश पाठवतो .मेघदूत हे काव्य अतिशय उत्कृष्ट अशी रचना आहे .

vi. **<u>विशाखादत्त</u> :-**

विशाखादत्त याने **मुद्राराक्षस** या सात अंकी नाटकाची रचना संस्कृत भाषेत केली. विशाखादत्त चा काळ इसवी सनाच्या सहाव्या शतकाच्या उत्तरार्धात मानला जातो . या नाटकाच्या कथावस्तू चा आधार कूटनीती आहे .नंद वंशाचा नाश करून आर्य चाणक्य व चंद्रगुप्त मौर्याने , मौर्य साम्राज्याची स्थापना कशी केली याचे वर्णन या नाटकात आहे. तसेच मौर्य साम्राज्याचा विकास करण्यासाठी आर्य चाणक्याने नंदांचा स्वामीभक्त मंत्री राक्षस यास कूटनीतीचा वापर करून आपल्याकडे वळवण्याचा प्रयत्न केला. पण राक्षस थोडाही विचलित झाला नाही . याच नाटकात गुप्तवंशाच्या पुन:स्थापनेची ही कथा आहे.रामगुप्त, चंद्रगुप्त -II , रामगुप्ता ची पत्नी ध्रुवस्वामिनी यांचेही वर्णन या नाटकात आहे.

विशाखादत्त यांने **'देवी चंद्रगुप्त'** या दहा अंकी नाटकाची रचना केली. या नाटकातील प्रमुख पात्र गुप्तवंशातील रामगुप्त व चंद्रगुप्त व ध्रुवदेवी ही आहेत . या नाटकावरून गुप्त वंशातील रामगुप्त व चंद्रगुप्त द्वितीय यांची माहिती मिळते .या नाटकाचे कथानक असे आहे. "समुद्रगुप्तानंतर त्याचा पुत्र रामगुप्त हा सत्तेवर आला. तो कर्तत्वहीन व विलासी राजा होता. त्याच काळात शक राजा रुद्र सिंहाने गुप्त साम्राज्यावर हल्ला केला व रामगुप्ताचा पराभव केला . त्यानंतर त्यांच्यात झालेल्या तहानुसार रामगुप्त यांनी आपली पत्नी आणि ध्रुव देवी रुद्र सिंहास नजर करण्यास तयार झाला पण ही अपमानास्पद अट राम गुप्ताचा लहान भाऊ चंद्रगुप्ताला मान्य नव्हती .त्याने ध्रुवदेवीच्या वेशात जाऊन रुद्र सिंहाला ठार केले .त्यामुळे शकांचे गुप्त साम्राज्यावर आलेले संकट टळले .या नंतर चंद्रगुप्ताने राम गुप्ताला ठार करून ध्रुवदेवीशी विवाह केला. तसेच तो गुप्त साम्राज्याच्या गादीवर विराजमान झाला ."

**<u>vii.हर्षचरित</u>** :-

वर्धन घराण्यातील सम्राट हर्षवर्धन याचा सभा पंडित बाणभट्ट याने हर्षचरित हा ग्रंथ लिहिला. या ग्रंथात हर्षवर्धनाच्या वंशाचे व चरित्राचे वर्णन केले आहे . हर्षचरित हे एक ऐतिहासिक काव्य मानले जाते. बाणभट्टाने या ग्रंथात आपल्या पूर्वी होऊन गेलेल्या अनेक प्रसिद्ध कवी आणि ग्रंथांचीही प्रशंसा केली आहे .यावरून हर्षवर्धनाचे चरित्र , वर्धन वंश आणि भारतातील बौद्ध धर्माच्या प्रसाराचे व प्रचाराची माहिती होते. इ.स.च्या सातव्या शतकाच्या पूर्वार्धात कवी बाणभट्ट होऊन गेला.

**<u>viii. मृच्छकटिकम्</u>** :-

शुद्रक या कवीने अत्यंत रोचक व बहुरंगी मृच्छकटिक या दहा अंकी नाटकाची रचना केली. शुद्रकाचा हा कालखंड इ स पूर्व दुसरे शतक ते इ सनाच्या सहाव्या शतकाच्या दरम्यान मानला जातो . याचे कथानक पुढीलप्रमाणे आहे. दरिद्री परंतु अत्यंत गुणी ब्राह्मण चारुदत्त व रुपवती गणिका वसंतसेना यांच्यातील पारस्परिक प्रणयाच्या कथेचे वर्णन या नाटकात केले आहे .याच नाटकात शुद्रकाने राज्यक्रांतीच्या कथेचेही कुशलतापूर्वक वर्णन केले आहे . उत्तम चरित्र चित्रण, कथा वस्तूंचे सुंदर संयोजन, समाजातील उच्च व नीच अशा सर्व वर्गातील पात्र, व मानवीय भावनेतील घात प्रतिघात यांचे यशस्वी प्रस्तुतीकरण यामुळे हे

नाटक देश-विदेशात प्रसिद्ध झाले .रशिया , अमेरिका व फ्रान्स या देशात या नाटकाचे अनेक वेळा प्रयोग झाले .या नाटकावरून गुप्तकाळातील सामाजिक, धार्मिक व राजकीय परिस्थितीची माहिती मिळते .

**ix. वासवदत्ता :-**

सुबंधु याने वासवदत्ता या गद्य काव्याची रचना संस्कृत भाषेत केली . वासवदत्ता या गद्य काव्याची स्तुती बाण, मंख व कविराज यांनी केली आहे. कुसूमपुर नगरीची राजकन्या वासवदत्ता आणि राजकुमार कदर्पकेतू यांच्या पारस्परीक प्रणयाच्या विघ्नयुक्त कथेचे वर्णन या गद्यकाव्यात केले आहे. याशिवाय सुबंधूंनी या ग्रंथात आपल्या काळातील बदललेल्या स्थितीचे ही वर्णन केले आहे. तसेच गुप्त सम्राट चंद्रगुप्त द्वितीय यांच्यानंतर गुप्त साम्राज्यात निर्माण झालेल्या अंतर्गत अशांततेचे वर्णन सुद्धा या ग्रंथात केले गेले आहे .

**x. कथासरित्सागर :-**

कश्मिरी पंडित सोमदेव याने अकराव्या शतकाच्या उत्तरार्धात काश्मीर नरेश हर्ष यांच्या राज्यकाळात कथासरित्सागर हा कथासंग्रह लिहिला . यामध्ये समुद्रगुप्त, चंद्रगुप्त द्वितीय विक्रमादित्याच्या पराक्रमाचे वर्णन केलेले आहे. गुप्त वंशाचा इतिहास समजण्यासाठी या कथासंग्रहाचा उपयोग होतो .

**xi. गाथासत्तसई / गाथासप्तशती :-**

या प्राकृत काव्यसंग्रहाची रचना व संपादन सातवाहन घराण्यातील सतरावा राजा हाल याने केली. या ग्रंथांमध्ये सातवाहन काळातील सामाजिक आणि धार्मिक जीवनावर प्रकाश टाकण्यात आला आहे . राजा हाल याने ' धवलकाव्य' नावाचा दुसरा ग्रंथ लिहिला .या ग्रंथांमधील वर्णन पैठणशी जुळणारे आहे . हा ग्रंथ प्रणयी जीवनावरील ग्रंथ आहे. .

**xii. राजतरंगिणी :-**

कश्मीरचा लेखक कल्हण यांनी राजतरंगिणी हा ग्रंथ इ. सनाच्या बाराव्या शतकात लिहिला. या ग्रंथात कश्मीरच्या इतिहासाचे वर्णन केले आहे . हा भारताचा ' पहिला ऐतिहासिक ग्रंथ ' म्हणून ओळखला जातो .

**परकीय साधने :-**

इसवी सन पूर्व सहाव्या शतकापासून भारतीयांचा परकीयांशी संबंध येत गेला. आक्रमण ,व्यापार ,प्रवास, राजनीति , राजदूत ,धर्मप्रसार व धर्माभ्यास अशा विविध माध्यमातून अनेक परकीय भारतात आले .इराणी, ग्रीक-रोमन, चिनी-तिबेटी आणि शक, पल्लव, कुशान ,हुण व इस्लामी लोकांचा भारताची संपर्क आला. या सर्वांनी भारताविषयी बरीच माहिती प्रवास वर्णनाच्या रूपाने लिहून ठेवली .त्यापैकी प्रत्यक्ष डोळ्यांनी पाहिलेली व काही ऐकीव माहितीवर आधारलेले हे लिखाण आहे . परकीय इतिहास लेखन पूर्वग्रहरहित व समकालीन असल्याने ते विश्वसनीय मानता येते .परंतु त्याच बरोबर स्वदेशाचा अहंकार,भाषेचे अज्ञान, धार्मिक प्रेरणा ,संस्कृतीची अनभिज्ञता व केवळ दार्शनिकता अशा अनेक त्रुटी आणि दोष परकीयांच्या लेखनात आहेत. त्या बाजूला सारून चिकित्सक दृष्टीने त्यांची छाननी केल्यास ही साधने जास्त उपयुक्त ठरतात .

यामध्ये हिरोडोटस इतिहासाचा जनक मानला जातो त्याच्या 'हिस्टोरिका' या ग्रंथात भारताबद्दलचे उल्लेख सापडतात. प्राचीन भारताच्या इतिहासाचे आकलन होण्यासाठी परकीय साधनांचे महत्त्व अतातीत आहे. यामध्ये पुढील ग्रंथ महत्त्वाचे ठरतात .

**1. भूगोल:-**

अलेक्झांडरच्या भारताच्या स्वारीच्या पूर्वी युनानी प्रवासी सुद्धा येऊन गेले होते .पर्शियाचा सम्राट डेरियस चा युनानी सैनिक स्काईलेक्स भारतात आला होता. त्याने लिहिलेल्या वृत्तांतावरून सिंधू संस्कृतीची माहिती मिळते. स्काईलेक्स याच्या वृत्तांतावर आधारित ' हिलेटिअस मिलेटस ' याने सिंधू संस्कृतीच्या संदर्भात ' भूगोल ' नावाचा ग्रंथ लिहिला .

**2. निआर्कस:-**

निआर्कस अलेक्झांडरच्या राज्याच्या ताफ्याचा अध्यक्ष होता. त्याने लिहिलेला ग्रंथ आज उपलब्ध नाही .पण त्याच्या लिखाणातील वृत्तांताचा काही भाग एरियन व स्ट्रेबो यांनी लिहिलेल्या ग्रंथात आढळतो .

**3.पेरिप्लस ऑफ दि एरिथ्रियन सी:-**

पेरिप्लस या ग्रंथाचा अज्ञात ग्रंथ कर्ता तसेच प्लिनी व स्ट्रेबो या ग्रीक लेखकाचे साहित्य भारताचा इतिहास समजण्यासाठी उपयुक्त ठरतात. हा ग्रंथ इ.स.50 ते 130 या कालखंडामध्ये एका अज्ञात ग्रीक खलाशाने लिहिला आहे .या ग्रंथातील 51 व्या प्रकरणात दक्षिणपथातील महत्त्वाच्या व्यापारी केंद्रांची माहिती मिळते. त्यामध्ये गुजरातमधील मधील बॅरिगाझा (भडोच) ते 20 दिवसाच्या प्रवासाने गाठता येणारे पैठण आणि पैठणच्या पूर्वेस दहा दिवसाच्या प्रवासाने गाठता येणारे तगर (तेर) या दोन मोठ्या व्यापारी केंद्रांची माहिती मिळते. पेरिप्लस या ग्रंथावरून सातवाहनांचा कालखंड ठरविण्यास मदत होते .

**3. टॉलेमी:-**

टॉलेमी याने भूगोल हा ग्रंथ लिहिला .या ग्रंथावरून भारताचा भूगोल व इतिहास समजण्यास मदत होते .ग्रीक ज्योतिषशास्त्रज्ञ टोलेमी हा 130 साली भारतात आला . त्याने बदामी, पट्टदकल या शहरांना भेटी दिल्या. त्याने लिहिलेल्या प्रवासवर्णनात सातवाहनांची राजवट, महाराष्ट्र व दक्षिण भारत यासंबंधातील माहिती सविस्तरपणे दिली आहे. सातवाहन काळातील पश्चिम किनाऱ्यावरील भडोच ,कल्याण, नालासोपारा ही बंदरे तसेच भडोच व पैठण यांचे भौगोलिक स्थान, दळणवळणाचे मार्ग ,साधने ,व्यापारी वस्तू,व पैठणचा राजा पूलुमावी यांचे वर्णन त्याने प्रवासवर्णनात केली आहे .

**4. नॅचरल हिस्ट्री :-**

प्लिनी या ग्रीक व्यक्तीने नॅचरल हिस्टरी हा ग्रंथ इ.स.77 मध्ये लिहिला. या ग्रंथात इटाली, सायप्रस, ग्रीक आणि भारत यांच्यातील व्यापाराचे वर्णन आढळते .दक्षिण भारताच्या पश्चिम किनारपट्टीवरील वर्चस्व निर्माण करण्यासाठी शक- क्षत्रप आणि सातवाहन यांच्यातील स्पर्धेचे वर्णनही या ग्रंथात आले आहे .

**5. इंडिका:-**

इंडिका हा मौर्य काळासंबंधी विश्वसनीय माहिती पुरविणारा श्रेष्ठ ग्रंथ आहे .ग्रीक सेनापती सेल्युकस निकेटरचा चंद्रगुप्त मौर्याने पराभव केला आणि सेल्युकसने मेगॅस्थेनिस नावाचा ग्रीक वकील मोर्यांच्या दरबारात ठेवला. तो भारतात पाच वर्षे होता आणि त्यांनी प्रत्यक्ष पाहिलेली माहिती आपल्या इंडिका या ग्रंथात लिहून ठेवली. परंतु मूळ ग्रंथ उपलब्ध नाही स्ट्रेबो व डायोडोरस या ग्रीक लेखकांच्या लिखाणातून इंडिका चे महत्त्वपूर्ण परीच्छेद मिळालेले आहेत. ही माहिती समकालीन असल्याने विश्वसनीय मानता येते. परंतु लेखकाचे भारतीय संस्कृती, धर्म, चालीरीती व भाषेसंबंधी चे ज्ञान अपुरे असल्याने त्यात बरीच माहिती चुकीची दिलेली आहे . तसेच मूळ ग्रंथ उपलब्ध नसल्याने ती ऐकीव आहे. भारतात कमी काळ व ठराविक परिसरात राहिल्याने त्याचे वर्णन विशिष्ट प्रदेशापुरते मर्यादित राहिले. ह्या त्रुटी मान्य करूनही चंद्रगुप्ताच्या काळातील सैन्यव्यवस्था, पाटलीपुत्रा चे प्रशासन, समाजस्थिती आणि राज दरबाराचे केलेले चित्रण उपयुक्त ठरते .

**चंद्रगुप्ताच्या दरबाराचे वर्णन:-**

मेगॅस्थेनिसने जवळून पाहिलेल्या चंद्रगुप्ताच्या दैनंदिन जीवनाचे व दरबाराचे विस्तृत वर्णन केलेले आहे. राज्याच्या रक्षणासाठी स्त्री अंगरक्षक होत्या .जीविताला धोका असल्याने तो झोपण्याची जागा दररोज बदलत असे .सम्राट हत्तीवर बसून शिकार करी .त्यासाठी तो भव्य मिरवणुकीसह राजधानी बाहेर पडे. त्याचा राजवाडा थाटमाट संपन्न होता .त्यातील स्तंभावर सोन्याचा पत्रा मिळवलेला होता. त्यावर चांदीचे पक्षी कोरलेले होते. राजवाड्यात भव्य इमारती ,सरोवर, उपवने व भोवताली वृक्षराजी होत्या. त्या ठिकाणी सोन्याच्या भांड्यांचा सर्रासपणे वापर चालू होता .नक्षीकाम केलेली टेबल-खुर्च्या दिवाणखान्यात होते .हिरे माणकांनी मढविलेल्या तांब्याच्या भांड्यांचा उपयोग होत असे. राजपरिवार वेलबुट्टी व सोन्याचे जरीकाम केलेली वस्त्रे वापरीत. राजा वेळोवेळी मलमलीचे सुंदर कपडे व दागिने घालून आणि पालखीत बसून प्रजेला दर्शन देत असे. तो हत्ती घोड्यांचा ही उपयोग करी. समाजात शस्त्र, कवायती व बैलांच्या स्पर्धा होत .

**पाटलीपुत्र राजधानीचे वर्णन :-**

पाटलीपुत्र ही मौर्य साम्राज्याची राजधानी होती. शहर व्यवस्थापनासाठी 30 सदस्यांचे एक मंडळ व सहा उपसमित्या होत्या. उद्योगधंदे ,उत्पादन, मजुरांचे वेतन ,मालाची शुद्धता, मजूर , रक्षण, परदेशी पाहुण्यांची व्यवस्था, जन्म-मृत्यूची नोंद ,खरेदी-विक्री, व्यापार, कर आकारणी, परवाने, वजन- मापे ,सार्वजनिक कामे, मंदिर, बाजार व्यवस्था व धार्मिक कर गोळा करणे ही अनेकविध कामे 6 समित्या करीत. कर चुकविणाऱ्यांना शिक्षा होती .पाटलीपुत्र नगरी गंगा व शोण नदीच्या संगमावर होती. नगर भव्य सुंदर असून भोवताली तटबंदी व खंदक होता. शहरास 64 वेशी 570 बुरूज होते. नगराची लांबी नऊ मैल व रुंदी एक मैल होती. ही तपशीलवार माहिती मेगॅस्थनीस ने दिली आहे.

**सैन्य**:-

चंद्रगुप्त जवळ कार्यक्षम प्रचंड सैन्य होते .लष्कराची व्यवस्था पाहण्यासाठी पाच सदस्यांच्या सहा समित्या होत्या. युद्धकाळात त्या जास्त कार्यरत असत .पायदळ,अश्वदल, रथदळ व हस्तिदळ , रसद पुरवठा व दळणवळण या समित्या बनविलेल्या होत्या . सैन्याला रोख वेतन आणि धनुष्यबाण, तलवार , ढाल व बरची इत्यादी शस्त्रे शासनाकडून दिलेली असत .

**मौर्यकालीन समाजजीवन:-**

मौर्यकालीन समाजजीवनाची प्रदीर्घ माहिती मेगॅस्थेनिसने लिहून ठेवलेली आहे. परंतु त्यात बरीच विसंगती आहे. भारतीय समाजात 7 वर्ग असून ते आपापली कामे वंश परंपरेने करतात .जातीची बंधने कडक असून आंतरजातीय विवाहास मान्यता नाही. समाजात पंडित , शेतकरी ,शिकारी ,व्यापारी ,कारागीर ,सैनिक, गुप्तहेर व अधिकारी हे सात वर्ग आहेत . पंडिता मध्ये संन्याशी व पुरोहित असे दोन प्रकार आहेत. राजा ह्या वर्गाची दरवर्षी सभा बोलवून राष्ट्रीय व सामाजिक प्रश्नांवर त्यांचा सल्ला घेतो. सर्व जमीन राजाच्या मालकीची असून शेतकरी जमीन कसतात आणि राजाला उत्पादनाचा 1/4 हिस्सा कर देतात. भटकणाऱ्या धनगर व शिकाऱ्यांचा स्वतंत्र वर्ग असून तो समाज रक्षणाची जबाबदारी सांभाळतो. लोकसंख्येच्या दृष्टीने सैनिकांचा मोठा वर्ग अस्तित्वात असून त्याचा खर्च शासन करते .राज्यात सक्षम गुप्तहेर खाते व हेरांचा स्वतंत्र वर्ग आहे .ते सम्राट व न्यायाधीशाला कटकारस्थानाची माहिती पुरवतात. दरबारी अधिकारी व सल्लागाराची सातवी श्रेणी आहे. त्यातूनच राजा सेनापती , न्यायाधीश, मंत्री व प्रमुख अधिकाऱ्यांची निवड करी. हा वर्ग चारित्र्यवान, कार्यक्षम व कुशाग्र बुद्धीचा आहे .

मेगॅस्थेनिसने भारतीयांच्या स्वभावातील सूक्ष्म छटा स्पष्ट केल्या आहेत .भारतीय लोक मितभाषी, शांत व प्रामाणिक आहेत . चार लक्ष सैन्यातील एका दिवसाच्या चोरीची रक्कम फक्त दोनशे दीनार होती. भारतीयांना लेखन कला माहित नाही .त्यांचा पुनर्जन्मावर विश्वास आहे. काही लोक नदी- समुद्र किनारी राहतात. मात्र बहुसंख्य समाज दगड विटांनी बांधलेल्या

नगरात राहतो. ते प्रसंगी मद्यपान करतात .सरळमार्गी असून कोणी चोऱ्या करीत नाही. कमी लोक न्यायालयात जातात .तेथील प्रजाजनाकडे भरपूर संपत्ती असून ती घरात उघड्यावर ठेवतात. ते वेगवेगळे भोजन करतात. त्यांच्यात बहुपत्नीकत्वाची प्रथा आहे .लोक उंची वस्त्रे वापरतात. समाज कर्जबाजारी नाही व साहुकार व्याज घेत नाहीत.

विविध क्षेत्रातील व्यवस्थापन सुसंगत आहे .बाजार, नगरे, कर वसुली ,भूमापन ,नद्या व जलमार्ग इत्यादी कामे करण्यासाठी प्रशासकीय अधिकारी वर्ग आहे . सडक मार्ग बनविणाऱ्याकडून कर घेतले जातात .तक्षशीला ते पाटलीपुत्र एक मोठा रस्ता असून बाजूला अंतर दर्शवणारे स्तंभ आहेत .अशा दोन स्तंभातील अंतर 1940 गज आहे .रस्त्याची पाहणी करण्यासाठी स्वतंत्र अधिकारी आहेत .सोने काढण्याचा उद्योग मोठ्या प्रमाणात चालतो .अशा पद्धतीने तत्कालीन स्थितीचे वर्णन ग्रीक वकील मेगॅस्थेनिस याने केलेले आहे .

फाह्यानचे फो-क्यो-की:-

फाह्यान हा चिनी प्रवासी इसवी सन 399 ते 411 दरम्यान या काळात भारतात येऊन गेला . सहा वर्षांपेक्षा जास्त काळ तो येथे होता. ही चंद्रगुप्त विक्रमादित्याची वैभवसंपन्न कारकीर्द होती. तत्कालीन राजकीय, सामाजिक, आर्थिक व धार्मिक जीवनाविषयीची माहिती त्याने लिहून ठेवली . चीनमधील शान्शी प्रांतातील चांग - मान येथील रहिवासी होता. त्याने लहानपणीच बौद्ध धर्म स्वीकारला. तो बौद्ध धर्माचा निष्ठावंत अनुयायी होता. गौतम बुद्धांच्या पवित्र स्थानांना भेटी द्याव्यात व बौद्ध वाङमयाचा अभ्यास करावा ह्या उद्देशाने फाहियान भारतात आला. या भ्रमंतीत त्याने तीस देशांना भेटी दिल्या. फो-क्यो-की ग्रंथात त्याने आपले अनुभव ग्रथित केलेले आहेत . भारतात तीन वर्षे संस्कृतचे अध्ययन करण्यात घालविण्याने तो संस्कृतचा जाणकार बनला. गुप्तकाळाचे समकालीन व विश्वसनीय साधन म्हणून फाह्यानच्या प्रवासवर्णनाचा फार मोठा उपयोग होतो .मात्र या लेखनात बऱ्याच त्रुटी आहेत .फक्त त्याने भ्रमण केलेल्या प्रदेशाची माहिती त्यात आहे. त्याचप्रमाणे तो ज्या गुप्त सम्राटांच्या कारकिर्दीत भारतात राहिला त्याविषयीचा कोठेही उल्लेख नाही .केवळ बौद्ध धर्माच्या दृष्टीकोणातून माहिती नोंदविल्याने ती एकांगी वाटते. त्याने अनेक बौध्द ग्रंथाचा चिनी भाषेत अनुवाद केला. त्यामुळे त्याच्या वर्णनात धार्मिक विवेचनाचा भाग जास्त आहे .

**धार्मिक स्थिती:**

प्रारंभी फाह्यानने तुर्कस्तान, खोतान व काबुल या प्रवासातील ठिकाणांची माहिती दिली. तेथे बौद्धधर्माचा प्रसार झाल्याचे सांगतो . भारतातील गांधार प्रांतात असंख्य हीनयानी आहेत . तक्षशिलेमधील राजा, मंत्री व लोक स्तूपांची पूजा करतात. पुष्पपूर मध्ये (पेशावरमध्ये) 700 बौध्द श्रमण आहेत . ते भिक्षा मागतात. जवळच्या हिड्डा नगरात रत्न व सोन्याचा पत्रा मढविलेला स्तुप आहे. मध्य भारतातील मथुरेत बौद्ध धर्माचा प्रभाव जास्त आहे. तेथील नदीच्या किनाऱ्यावर आणि शहरात 20 विहार आहेत. त्यात 30000 भिक्षू राहतात. मरू भूमीतील (मारवाड) राजे बौध्द आहेत. ते स्वतः स्वयंपाक करुन भिक्षूंना भोजन देतात व त्यांचे आदरातिथ्य करतात. कान्यकुब्ज (कन्नौज) येथे असंख्य भिक्षू आहेत. देशात बौद्ध धर्माचे 96 संप्रदाय आहेत.ताम्रलिप्ती येथे 24 संघ आहेत आणि पाटलीपुत्र नगरीत अनेक स्तूप व विहार आहेत. लोकांचा पारलौकिक जीवनावर विश्वास आहे. बौध्द विहारात अतिथी -भिक्षू आल्यास त्यांचे मनापासून आदरातिथ्य केले जाते . त्यांच्या भोजन, निवास व कपड्याची सोय होते . दानशूर लोकांनी मोठमोठ्या असंख्य धर्मशाळा बांधल्या. ही धार्मिक माहिती फाह्यानने कथन केली .

**समाज जीवन :-**

फाह्यानने गुप्तकालीन समाज जीवनाचे वर्णन केलेले आहे . लोक सुखी, संपन्न धार्मिक व प्रामाणिक आहेत. ते जास्त गुन्हे करीत नाहीत. राजा मृत्युदंडाची शिक्षा देत नाही .फक्त गुन्हेगारांना दंड आहे . फार मोठा गुन्हा असल्यास डावा हात तोडला जातो. लोकांवर बौद्ध धर्माचा प्रभाव असल्याने ते अहिंसेचे पालन करतात. समाज मासान्न भक्षण करीत नाही व मद्यपान करीत नाही; एवढेच नव्हे तर लोक कांदा- लसूण ही खात नाहीत . ते मुर्गी व डुकरे पाळीत नाहीत व शिकार करीत नाहीत. पशूंची विक्री होत नाही. शहरात कोठेही कत्तलखाने किंवा मद्याची दुकाने नाहीत .शिकार करणारा , मासे पकडणारा, विक्री करणारा 'चांडाळ वर्ग' शहराबाहेर राहतो .त्याला काठी आपटून (वर्दी देऊन ) गावात प्रवेश करावा लागतो. त्यांच्याबाबतीत अस्पृश्यता पाळली जाते . काही श्रमण भिक्षू आहेत व इतर गृहस्थी आहेत . हा वर्ग अध्ययन, चिंतन व इतर भिक्षूंचे आदरातिथ्य करतो .काही श्रमण संपत्ती मिळवून धर्मकृत्ये करतात . प्रतिहार व कर्मचाऱ्यांना वेतन दिले जाते .

उत्तर भारतातील रस्ते व प्रवास सुखकर आहे. ठिकठिकाणी धर्मशाळा, निवास, भोजनाची सोय आहे .मात्र दक्षिणेतील मार्ग खडतर व धोकादायक आहेत. बरेच राज्यकर्ते प्रवाशांना संरक्षण देतात. ताम्रलिप्ति हे बंदर आहे .कपिलवस्तु , राजगृह व श्रावस्ती ही नगरे भगनावस्थेत आहेत. लोकांना कोठेही जाण्याचे संचार स्वातंत्र्य आहे. पाटलीपुत्र हे राजधानीचे शहर भव्य व सुंदर आहे. तेथे भग्नावस्थेत मौर्यकालीन अशोकाचा तीन मजली राजवाडा शिल्लक आहे. ही सामान्य माणसाने बनवलेली वास्तुकला नाही. त्यात मोठा दिवाणखाना, कलात्मक फर्शी, भव्य स्तंभ व मोठे द्वार आहेत . जवळच एक स्तूप व दोन विहार आहेत . तेथे बौद्ध पंडित व भिक्षु राहतात. शहरात श्रीमंत व दानशूर लोक असून त्यांनी चालविलेली अनेक औषधालये , रुग्णालय , धर्मशाळा, अनाथालये व अन्नछत्रे आहेत. अनेक विद्वान , श्रमण , कारागीर, कलावंत व व्यापारी तेथे राहतात . पाटलीपुत्र नगरी वैभव संपन्न आहे . ठिकठिकाणी बुद्धांचे पुतळे आहेत. दरवर्षी भव्य रथयात्रा निघतात. देश व समाज सुखी, समाधानी व धनवान आहे . अशा रीतीने भारतीय जीवनाचे बारकावे फाह्यानच्या वर्णनातून मिळतात. मात्र गुप्तकाळात भरभराटीस आलेल्या हिंदू धर्माचा उल्लेख त्यात आढळत नाही .

<u>हुएनसँग (तातांग - सियुकी) :-</u>

बौद्ध भिक्षू हुएनसँगचे भारतातील आगमन ही घटना ऐतिहासिकदृष्ट्या महत्त्वपूर्ण होती .एक चिनी यात्रेकरू बौद्ध धर्माचा अभ्यास करण्यासाठी आपल्या देशात येतो ही बाब गौरवास्पद होती. प्राचीन काळात जगाला देण्यासाठी भारताजवळ खूप गोष्टी होत्या हे त्यातून सिद्ध होते. सातव्या शतकातील राजकीय, सामाजिक, आर्थिक, धार्मिक व सांस्कृतिक हर्षकालीन इतिहास हुएनसँगचे प्रवासवर्णनातून उपलब्ध होतो . तो इ. स. 629 ते 644 पर्यंत 14 वर्षे भारतात भ्रमण करीत होता. काश्मीर, पंजाब, कपिलवस्तु, बनारस , गया, कामरूप आणि नालंदा विद्यापीठ , चालुक्य राज्य व अजिंठा लेण्या इत्यादी ठिकाणी त्याने भेटी दिलेल्या होत्या. मायदेशी जाताना त्याने 657 ग्रंथ, शेकडो बौद्ध मूर्ती व अनेक वस्तू सोबत नेल्या. हुएनसँगची प्रवास वर्णने बील, हु-ली, या विद्वानांनी इंग्रजीत प्रसिद्ध केली. हे ग्रंथ व हुएनसँगचे प्रवासवर्णन ' तातांग -सियुकी' द्वारे तत्कालीन इतिहासाची माहिती मिळते. हर्षकालीन इतिहासाचे हे एक प्रमुख साधन आहे .

**पाटलीपुत्र नगरीचे वर्णन :-**

हुएनसँगने पाहिलेल्या अनेक नगरांची माहिती त्याने आपल्या प्रवासवर्णनात वर्णिलेली आहे . पाटलीपुत्र नगरीचे वैभव संपलेली आहे. मात्र कन्नौज शहर भरभराटीस आलेले आहे .शहरात भव्य राजवाडा, मोठ्या वास्तू, उद्याने व सरोवर आहेत . प्रयाग दुसरे महत्त्वपूर्ण शहर असून श्रावस्ती व कपिलवस्तूंचे महत्त्व कमी झालेले आहे . नालंदा व वल्लभीत बौद्ध धर्माचा प्रभाव आहे. या विविध शहरात लहान मोठे रस्ते व दुकाने आहेत. त्या ठिकाणी अनेक व्यवसायिक राहतात.

नगरातील रस्ते स्वच्छ नाहीत . घरे चूना , लाकूड , विटांनी बांधलेली आहेत . शूद्र लोक शहराच्या उपनगरात राहतात. काही इमारती चीन प्रमाणे आहेत .घराच्या भिंतींना शेण व चुन्याचा थर दिलेला आहे. घरात फुलझाडे आहेत .शहरात विहार असून त्याच्या चार बाजूस बuरूज ( मनोरे ) आहेत. आत भिक्षूंसाठी खोल्या व सभागृह आहे .शहरातील इमारती अनेक मजली असून त्यांची प्रवेशद्वारे पूर्वेकडे आहेत . भिक्षूंचे कपडे साधे व पांढरे आहेत. समाजात जातिप्रथा आहे . ब्राम्हण धर्म कार्य करतात व वैश्य व्यापार करतात . राजा व शासक क्षत्रिय आहेत. शूद्र शेती करतात. ब्राह्मण व क्षत्रिय स्वच्छ राहतात .त्यांचे जीवन समृद्ध आहे . लोक पादत्राणे कमी वापरतात . ते आपल्या दातावर खून करतात. केशरचना नीटनेटकी करतात. त्यांच्या कानात छिद्र आहे. भोजनाच्या पूर्वी व नंतर ते पाय, हात , तोंड स्वच्छ धुतात. सर्वसामान्य लोक जास्त बुद्धिमान नाहीत. परंतु ते निष्कपट, सदाचरणी, प्रामाणिक व उदार आहेत. भौतिक जीवनास ते महत्त्व जास्त देत नाहीत. अंतरवर्णीय विवाह होत नाहीत. लोक शाकाहारी असून कांदा -लसूनही खात नाहीत. गहू , डाळी ,साखर, फळे व दुधाचे पदार्थ त्यांच्या आहारात असतात. विशिष्ट प्रसंगी ते मासांन्न भक्षण करतात .विधवाविवाह व पडदा पध्दती प्रचलित नाही. मात्र सतीप्रथा कायम आहे . प्रभाकर वर्धन ची पत्नी यशोमती सती गेली. राजा, अधिकारी व धनिक सोने, चांदी, हिरे व मोत्यांचे दागिने वापरतात. समाज संपन्न असून त्यांचा जीवनस्तर उंचावलेला आहे . समाजाची आर्थिक स्थिती चांगली आहे. रेशीम, ज्यूट, लोकर व सुती कपडे बनवण्याची कला अत्यंत विकसित झालेली आहे. लोकरी घोंगडी प्रसिद्ध आहे.

**शासन पद्धती :-**

लोक कायद्याचे पालन करतात व त्यांचे उल्लंघन केल्यास वाळीत टाकतात किंवा इतर शिक्षा दिली जाते. गुन्हेगारांची संख्या कमी आहे. परंतु शिक्षा कठोर आहे. नैतिक गुन्हा केल्यास ( आई-वडिलांचा विश्वासघात ) नाक-कान कापून शहराबाहेर घालवले जाते .न्यायदान करताना अपराध्याची स्थिती लक्षात घेतली जाते . शासन पद्धती कल्याणकारी आहे. सर्व भूमी राज्याच्या मालकीची आहे .राज्याच्या उत्पन्नाचे चार भाग केलेले आहेत . पहिला भाग राज्यकारभारासाठी, दुसरा मंत्री व कर्मचाऱ्यांच्या वेतनासाठी, तिसरा विद्वानांच्या पुरस्कारासाठी व चौथा दानधर्मासाठी वापरला जातो. कर कमी आहेत . राज्याची जमीन कसणाऱ्यांना १/६ महसूल द्यावा लागतो .व्यापारी देशभर संचार करतात. राजा हर्ष रात्रंदिवस प्रशासन कार्यात व्यग्र असतो . दिवसाच्या तीन भागापैकी तो एक भाग प्रशासनासाठी व दुसरा धार्मिक कार्यासाठी उपयोगात आणतो. राजा राज्यात दौरे काढून परिस्थितीचे अवलोकन करतो . शासनाच्या सर्व कामांची लेखी नोंद ठेवली जाते व त्यासाठी स्वतंत्र विभाग आहे. हर्षाचे लष्करी सामर्थ्य मोठे आहे. लष्करात 50000 पायदळ, 60000 हत्ती व १०००० घोडदळाचा समावेश आहे . सैन्य सीमेचे व राजवाड्याचे रक्षण करीत असते . त्यांना वेतन दिले जाते. अशा प्रकारे हर्षकालीन स्थितीचे व्यापक दर्शन हूएनसँगने घडवले आहे.

**<u>पुरातत्वीय साधने किंवा अलिखित साधने :-</u>**

समकालीनता व विश्वसनीयतेच्या दृष्टीने भौतिक साधनांना अनन्यसाधारण महत्त्व आहे. भारताचा बहुतांशी इतिहास भौतिक साधनांवर अवलंबून आहे. वाङमयात काल्पनिकता व अतिशयोक्ती जास्त असल्याने भौतिक साधने जास्त ऐतिहासिक मानली जातात. समकालीनता हे त्यांचे विशेषत्व आहे. सुदैवाने प्राचीन काळी प्रचंड प्रमाणात स्थापत्य, शिल्प, मंदिरे, लेण्या, मूर्ती ,नगरे व बौद्ध स्मारकांची निर्मिती झाली . त्यातून आपणास बराचसा इतिहास समजतो. भाषा व लिपी चा विकास झाल्यानंतर अनेक आलेख कोरण्यात आले. अनेक राजपुरुषांनी नाणी पाडली.या आलेख व नाण्यांमधुन इतिहासाच्या पाऊलखुणा दिसतात . विसाव्या शतकात पुरातत्त्वीय उत्खनन शास्त्राच्या मदतीने असंख्य भौतिक पुरावे उजेडात आले. सिंधू

संस्कृती, सातवाहन व वाकाटकांचा इतिहास याच प्रयत्नांमुळे उपलब्ध झाला . वाङमयीन साधनांना भौतिक पुराव्यामुळे बळकटी प्राप्त झाली .प्राचीन वास्तू व वस्तूच्या रूपाने मिळणाऱ्या भौतिक साधनांचा आढावा पुढीलप्रमाणे घेता येईल .

**अलिखित / पुरातत्वीय साधने:-**

या साधनांमध्ये शिलालेख, ताम्रपट, नाणी, मूर्ती , गुहालेख, लेणी, मंदिर , प्राचीन स्मारके व त्यांचे अवशेष आणि उत्खननात मिळालेल्या अवशेषांचा समावेश होतो.

1. **प्राचीन अवशेष व स्मारके:-**

भूतकालीन इतिहास आपल्या कर्तत्वाचे जे पुरावे मागे ठेवतो त्यास प्राचीन अवशेष असे म्हणतात. भारतात स्थापत्य, शिल्प, चित्र व धातुकाम कलेमध्ये आश्चर्यकारक प्रगती झालेली होती. त्याचे अवशेष भारतभर विखुरलेले आहेत .जमिनीवर व जमिनीत गडप झालेल्या हजारो वास्तू साक्षात इतिहास रूपाने कायम आहेत. त्यावरून प्राचीन अवशेषांचे स्थूलमानाने दोन प्रकार पडतात. ज्या पुरातत्वीय वास्तू व वस्तू जमिनीवर असून सहजपणे उपलब्ध होतात त्यांना **प्राचीन स्मारके** असे म्हणतात आणि जमिनीत गडप झालेल्या वास्तू उत्खनन करून मिळवाव्या लागतात त्यांना **प्राचीन अवशेष** असे म्हणतात. प्राचीन अवशेष आणि स्मारकांचे संरक्षण व संशोधन करण्यासाठी ' पुराणवस्तू संशोधन खात्याची' स्थापना करण्यात आली. तेव्हापासून आजतागायत भारतभर अनेक ठिकाणी उत्खनने झाली . त्यातून भारताचा उज्ज्वल इतिहास मिळू शकला . मोहेंजोदडो व हडप्पा च्या प्रदीर्घ उत्खनननांतर सिंधू संस्कृतीचा इतिहास प्रकाशात आला . डोंगराच्या कुशीत अज्ञात असलेल्या लेण्या व त्यातील स्थापत्य शिल्प संशोधनामुळेच प्रकट झाले . डॉ. कनिंगहॅम, व्हीलर, पीगाॅट , मार्शल, बॅनर्जी,साहनी व इतरांच्या परिश्रमातून पाटलीपुत्र , तक्षशिला , नालंदा, कपिलवस्तु , नागार्जुनकोंडा व मोहेंजोदडो , हडप्पा चे अवशेष उत्खननातून मिळाले आहेत.

महाराष्ट्रातील सातवाहन व वाकाटक घराण्याचा इतिहास पैठण, तेर, भोकरदन, नेवासा, वाशिम, रामटेक व पवनारच्या पुरातत्वीय संशोधनामुळे उपलब्ध झाला. सम्राट अशोकाच्या राजवाड्याचे अवशेष पाटलीपुत्र नगरीजवळ सापडले . सारनाथ, लुंबिनीवन व कपिलवस्तूच्या स्तूपांचे अवशेष पाटलीपूत्र जवळ मिळाले. सिंधू संस्कृतीचा पूर्ण इतिहास या भौतिक पुराव्यांवर आधारित आहे. अनेक सम्राटांच्या हजारो मुद्रा ठिकठिकाणी सापडल्या. आत्तापर्यंत झालेल्या उत्खननामध्ये नगरे , खेडी, राजवाडे ,मंदिरे , चैत्यगृह, विहार व विद्यापीठाच्या अनेक वास्तू उत्खननातून उपलब्ध झाल्या. त्याचप्रमाणे नाणी , मुद्रा , मूर्ती, अस्थि, विटा , खापरे, दागिने, वजने, मापे ,शस्त्रे ,औषधी ,शृंगार, पेट्या ,ताम्रपत्र , शिक्के, खेळणी, मातीची भांडी , धातूच्या वस्तू, कापड व धान्याच्या अवशेषांमधून आपणास प्राचीन काळातल्या सामाजिक ,आर्थिक ,धार्मिक व सांस्कृतिक इतिहासाची माहिती मिळते .

2. **स्मारके :-**

स्मारके हा प्राचीन अवशेषाचा एक प्रकार आहे . भारतीयांनी मौर्य काळापासून स्थापत्य व शिल्पकलेच्या क्षेत्रात नेत्रदीपक प्रगती केलेली होती. त्याचा चांगला परिणाम म्हणून चैत्यगृह, स्तूप , विहार , लेण्या, मंदिरे, राजवाडे , नगरे , मूर्ती , स्तंभालेख, मातीची व धातूची कलात्मक भांडी अशा विविध स्वरूपात भारतीय कला भरभराटीस आली . भारतभर आज ती विविध स्मारकांच्या रुपाने अस्तित्वात आहे . यामधून प्राचीन भारतीयांच्या ऐतिहासिक कर्तृत्वाचे दर्शन घडते. प्रामुख्याने या सर्व वस्तू धार्मिक स्वरूपाच्या आहेत. धर्मप्रसाराच्या भूमिकेतून त्यांची निर्मिती झाली. या स्मारकामधून तत्कालीन धार्मिक व सामाजिक जीवनाबरोबरच स्थापत्य, शिल्प ,मूर्ती ,चित्रकला आणि धातुकाम शास्त्राच्या उन्नतीची कल्पना येते .

आधुनिक काळात पुरातत्वशास्त्राला सामाजिक शास्त्राबरोबरच भौतिक शास्त्र म्हणून मानले जाते. उत्खननात मिळणाऱ्या विविध वस्तूंचे भूशास्त्र, रसायनशास्त्र, पदार्थविज्ञान, वनस्पतिशास्त्र, प्राणिशास्त्र इत्यादी विषयांच्या

प्रयोगशाळांमधून परीक्षण करणे शक्य झालेले आहे . उत्खननात मिळणाऱ्या वस्तू व वास्तूंचे अवशेष व एकूण क्षेत्रफळ यावरून तेथील लोकसंख्या, त्यांना लागणारे अन्न आणि उत्पादनाचे क्षेत्र व अवजारे समाजरचना , सामाजिक वर्ग, त्यांची आर्थिक स्थिती , धार्मिक जीवन इत्यादीची माहिती उत्खनित साधनांच्या आधारे मिळते . उत्खननात मिळणारे अवशेष हे जमिनीत गाडले गेलेले असल्याने त्यात बदल केल्या जाण्याची शक्यता नसते . त्यामुळे या अवशेषांना इतिहास लेखनाच्या दृष्टीने अतिशय महत्त्वाचे व विश्वासार्ह साधन म्हणून स्थान दिले जाते.

3. **आलेख:-**

भौतिक साधनात आलेखांना अद्‌वितीय स्थान आहे. ज्या वेळी भारतात लिपी, भाषेचा विकास झाला तेव्हापासून अनेक राज्यकर्त्यांनी असंख्य आलेख कोरविले . एका अर्थाने हे आलेख म्हणजे लिखित भौतिक पुरावे आहेत . संस्कृत ,पाली ,मागधी, मोडी, कन्नड, तेलुगू व इतर प्राकृत भाषेत हे आलेख लिहिले गेले . त्याचप्रमाणे ब्राम्ही, देवनागरी , तामिळ, कन्नड व खरोष्ट्री ही त्यांची लिपी आहे. परदेशातील म्हणजेच इराण, अफगाणिस्तान व आशिया मायनरमधील लेखांमधून देखील भारतीय इतिहासाचे ज्ञान मिळते. इतर लेखन सामग्रीची कमतरता असल्यामुळे आणि लेखी मजकूर दीर्घकाळ टिकावा म्हणून प्राचीन भारतीयांनी या लेखामधून इतिहास निर्मितीचा खटाटोप केला. स्तंभ, प्रस्तर, लेण्या, धातू, मंदिरे , भींती, छत ,कमानी व विविध इमारतींवर असंख्य आलेख कोरलेले पाहायला मिळतात. या माध्यमांमुळे स्तंभालेख ,गुहालेख , धातूलेख व प्रस्तरलेख ( शिलालेख ) असे प्रकार निर्माण झाले. धर्माज्ञा, धर्मोपदेश , राजाज्ञा , राजक्रूत्ये, नीतितत्वे, चरित्र ,वंशावळी, मंत्र व पदव्या इत्यादी विविध गोष्टी आलेखात वर्णिलेल्या आहेत. धर्मप्रसार करण्यासाठी व राजाज्ञा जनतेपर्यंत पोहोचविण्यासाठी काही आलेख कोरविण्यात आले. युद्धातिल विजय ,अभिनंदन, व्यापारी संस्था व विविध प्रसंगाच्या स्मृतिप्रीत्यर्थ लेखांची निर्मिती करण्यात आली. प्राचीन काळातील राज्यविस्तार , शासन प्रणाली , युद्धपद्धती , लष्कर व्यवस्था , शासन आधिकारी, समाजजीवन , देवता , धर्मकल्पना , अर्थस्थिती , व्यापार वृद्धि व करव्यवस्था इत्यादी अनेक विषयांची माहिती लेखांमधून मिळते .कालखंड, भाषा , लिपी व साहित्याचे ज्ञान त्यातून होते . समकालीनतेमुळे या लेखांना ऐतिहासिक श्रेष्ठत्व प्राप्त होते .

4. **शिलालेख :-**

शिलालेख प्राचीन भारताच्या इतिहासाच्या अभ्यासाची महत्त्वाची साधने आहेत. इतिहासाच्या अभ्यासाचे एक साधन म्हणून शिलालेखांकडे पाहिले जाते. मोठ्या- मोठ्या दगडी शिलांवर, खडकांवर आणि दगडी स्तंभांवर लेखन करण्याची पद्धती मौर्य सम्राट अशोकाच्या काळापासून सुरू झाली. अशोकाच्या शिलालेखात प्रामुख्याने राजाज्ञा व आदेश तसेच बौद्ध धर्माचे संदेश आढळतात. यानंतर या शिलालेखात राजांची गुणवर्णन, वंशावळी, सरदारांची व अधिकाऱ्यांची नामावली तसेच क्वचित प्रसंगी दानपत्र सुद्धा कोरलेले आढळतात .अशोकाच्या शिलालेखांची संस्कृत, खरोष्टी, प्राकृत , पाली भाषेतून ही शिलालेख कोरलेले दिसतात . प्रचंड आकाराचे खडक, गुहेच्या भिंती यावर लिहिलेल्या आलेखाना शिलालेख म्हणतात .

i. इ.स.पू. 1400 चा आशिया मायनरमधील बोगाजकोई शिलालेख आर्यांच्या मूळ स्थानावर प्रकाश टाकतो.
ii. अशोकाच्या 14 शिलालेख (प्रस्तरलेख), 7 स्तंभालेख , दोन कलिंगालेख व इतर लेखांमधून मौर्य घराण्याचा इतिहास समजतो.
iii. ओरिसातील कलिंग राजा खारवेल चा हाथीगुंफा शिलालेख शुंग व खारवेल घराण्याची माहिती पुरवितो.
iv. अशोकाच्या अलाहाबाद स्तंभावरील हरिषेण प्रशस्ती मधून समुद्रगुप्ताच्या दिग्विजयाची माहिती मिळते.
v. मेहरोली लोहस्तंभाद्‌वारे चंद्रगुप्त विक्रमादित्यचा इतिहास स्पष्ट होतो.

vi. नाणेघाटातील (जुन्नर) राणी नागनिकेचा आलेख व नाशिक लेण्यातील आलेख सातवाहन घराण्याचा इतिहास कथन करतात.

vii. शिलालेखामधून चालुक्य सम्राट दुसरा पुलकेशी व हर्षवर्धन यांची माहिती उपलब्ध होते .

5. **ताम्रपट :-**

हा आलेखाचाच एक प्रकार आहे. तांब्याच्या पत्र्यावर कोरलेल्या सनदांना ताम्रपट असे म्हणतात. प्राचीन काळी अनेक सम्राट, व्यक्ती व धर्मसंस्था दानधर्म करीत असत. दिलेल्या दानाची माहिती तांब्याच्या पत्र्यावर कोरून प्रशस्तीरूपाने (सनद) देण्याची पद्धती होती. अशा दानपत्रांनाच **ताम्रपट** म्हणत. यामध्ये राजा आपला व पूर्वजांचा पराक्रम, वंशावळी, आत्मस्तुती, राज्यविस्तार, मालमत्तेचा तपशील, जमिनीचा आकार, घेणाऱ्याचे नाव इत्यादींची भरपूर नोंद करीत असे. हे ताम्रपट संस्कृत व प्राकृत भाषेत आहेत. कालगणना, राजकीय इतिहास व धार्मिक धोरणांची माहिती यातून मिळते. विंध्यशक्तीचा वाशिम ताम्रपट, प्रभावती गुप्ताचा पुणे ताम्रपट व दुसऱ्या प्रवरसेनचा शिवनी ताम्रपट, वाकाटक घराण्याची ऐतिहासिक माहिती पुरवितात . स्कंदगुप्ताचा इंदोर ताम्रपट, हर्षाचा मधुबन ताम्रपटाच, कुमारगुप्ताचा दामोदर ताम्रपट आणि सातवाहन, राष्ट्रकूट व चालुक्य राजांच्या ताम्रपटामधून दक्षिणी राजघराण्याचा इतिहास प्राप्त होतो .शिलालेखाप्रमाणेच ताम्रपटानाही ऐतिहासिक महत्त्व आहे. कनिंगहॅम, प्रिन्सेप व बर्जेस या संशोधकांनी ताम्रपटांच्या लिपीचा अभ्यास करून त्याचे वाचन केल्यामुळे बराचसा अज्ञात इतिहास प्रकाशात आला .

6. **नाणी व मुद्राः-**


मौर्य काळापासूनचा इतिहास जाणून घेण्याचे उपयुक्त भौतिक साधन म्हणून नाण्यांचा उल्लेख करता येतो .आधुनिक काळात Neumismatics Society of India तर्फे भारतीय नाण्यांचा सखोल अभ्यास व संशोधन चालू असून तो इतिहासाला पूरक आहे. प्राचीन काळातल्या अनेक राजघराण्यांची हजारों नाणी सापडलेली आहेत. मुद्रा हा नाण्यांसारखाच एक प्रकार आहे .परंतु त्याचा चलनाप्रमाणे वापर होत नव्हता. राजमुद्रा ,व्यापारी मुद्रा, धार्मिक शिक्के, विविध संघटना व संस्थांच्या मुद्रा प्रचलित होत्या. मुद्रांवर प्रतिमा, मजकूर, पदव्या व बोधचिन्ह कोरलेले असे . त्या विविध धातूंचा होत्या.

मौर्य, गुप्त, सातवाहन , वाकाटक, हर्षवर्धन, चालुक्य राष्ट्रकूट , पल्लव , पांड्य व गुर्जर, प्रतीहार घराण्याची भरपूर नाणी उत्खननातून मिळालेली आहेत. वैदिक कालीन नाणी सापडली नाहीत ,परंतु नाण्याचे उल्लेख आहेत . सिंधु संस्कृतीतील हजारो शिक्के उत्खननात मिळालेले आहेत. स्वकियांप्रमाणेच मेसापोटेमिया, इराणी, इंडो-ग्रीक, शक, कुशाण राज्यकर्त्यांची शेकडो नाणी सापडली आहेत. भारतीय सम्राट ,मांडलिक राज्ये, गणराज्य व व्यापारी श्रेणींच्या मुद्रा व नाणी उपलब्ध झालेली आहेत. ही नाणी सोने, चांदी, तांबे व मिश्रधातूंची आहेत . नाण्यांवर व्यक्तींच्या प्रतिमा, पदव्या, चिन्हे , मजकूर आणि चित्रे आहेत .नाण्यांमधून राज्यविस्तार, धार्मिक धोरण, आर्थिकस्थिती व कलेची माहिती मिळते . समुद्रगुप्ताच्या अश्वमेध यज्ञ, वीणावादन, धनुर्धारी, शार्दुलवध व व्याघ्रमुद्रित नाणयांमधून त्याचा पराक्रम, रसिकता व धार्मिक धोरण स्पष्ट होते .

नाणी व मुद्रांमळे पुढील ऐतिहासिक फायदे झालेले दिसून येतात .

1. नाण्यांचा विशिष्ट आकार, प्रतिमा , मजकूर मधून धातुकाम व कलेचे दर्शन घडते .
2. नाण्यांमधील पदव्या व लेखी तपशिलातून राज्य विस्ताराची कल्पना येते.
3. धार्मिक बिरुदावली आणि प्रतिमांमुळे राजाच्या धार्मिक धोरणाचे स्वरूप स्पष्ट होते.
4. सोने, चांदी व तांब्याच्या नाण्यांवरून आर्थिक परिस्थितीची जाणीव होते.
5. नाण्यांवरील अनेक प्रतिमांद्वारे राज्यकर्त्याचा पराक्रम, रसिकता, विद्वत्ता व वेशभूषेचा अंदाज बांधता येतो .

**ब्राम्ही लिपीतील शिलालेख**








ASOKAN ALPHABET.

## वस्तुनिष्ठ प्रश्न

**प्रश्न 1. रिकाम्या जागी योग्य पर्याय निवडून खालील विधाने पूर्ण करा**

1. यजुर्वेदाचे .................................. असे दोन भाग पडतात .

अ) कृष्ण व शुक्ल ब) आयुर्वेद व धनुर्वेद क) गंधर्ववेद व शिल्पवेद ड) सुत्र व स्मृती

2. ...........................ब्राह्मण ग्रंथाचा अंतिम भाग म्हणून ओळखला जातो.

अ) स्मृतिग्रंथ ब) सूत्र ग्रंथ क) आरण्यके ड) सुत्र व स्मृती

3. ..................................... 'पाचवा वेद' असे म्हटले जाते.

अ) महाभारतास ब) मनुस्मृतिस क) त्रिपिटकास ड) अष्टाध्यायीस

4. बौद्ध धर्मीय साहित्यास ................म्हणतात.

अ) त्रिपिटक ब) स्मृतिग्रंथ क) वेदांगे ड) आगम

4. ................................ या ग्रंथामध्ये वर्णिलेला 'सप्तांग सिद्धांत' हा वैशिष्ट्यपूर्ण आहे.

अ) हर्षचरित ब) मृच्छकटिकम् क) अष्टाध्यायी ड) अर्थशास्त्र

5. ................................ हा ग्रंथ भारताचा ' पहिला ऐतिहासिक ग्रंथ ' म्हणून ओळखला जातो .

अ) गाथासप्तशती ब) मुद्राराक्षस क) राजतरंगिणी ड) कथासरित्सागर

6. ..................................या ग्रीक व्यक्तीने नॅचरल हिस्टरी हा ग्रंथ इ.स.77 मध्ये लिहिला.

अ) निआर्कस ब) प्लिनी क) एरियन ड) टॉलेमी

7. फाह्यान हा चिनी प्रवासी ................................ या राजाच्या काळात भारतात येऊन गेला .

अ) सम्राट हर्षवर्धन ब) सम्राट अशोक क) चंद्रगुप्त विक्रमादित्य ड) सम्राट दुसरा पुलकेशी

**योग्य पर्याय:**

1. अ) कृष्ण व शुक्ल 2. क) आरण्यके 3. अ) महाभारतास 4. ड) त्रिपिटक

5. क) राजतरंगिणी 6. ब) प्लिनी 7. क) चंद्रगुप्त विक्रमादित्य

**प्रश्न 2. योग्य जोड्या जुळवा.**

| अ. क्र. | अ गट | ब गट |
|---|---|---|
| 1 | कलिंग चा राजा खारवेल | पुणे ताम्रपट |
| 2 | प्रभावती गुप्ता | हाथीगुंफा शिलालेख |
| 3 | विशाखादत्त | अर्थशास्त्र |
| 4 | कालीदास | मुद्राराक्षस |
| 5 | कौटील्य | मेघदुतम |

**योग्य जोड्या**

1. कलिंग चा राजा खारवेल- हाथीगुंफा शिलालेख
2. प्रभावती गुप्ता- पुणे ताम्रपट
3. विशाखादत्त -मुद्राराक्षस
4. कालीदास- मेघदुतम
5. कौटील्य अर्थशास्त्र

**लघूत्तरी प्रश्न**

**प्रश्न 3. टिपा लिहा**

1. नाणी
2. शिलालेख
3. पौर्वात्यवादी दृष्टिकोण
4. राष्ट्रवादी दृष्टिकोन
5. मॅगेस्थेनिस चा इंडिका
6. कौटील्याचे अर्थशास्त्र

**दीर्घोत्तरी प्रश्न**

**प्रश्न 4. खालील प्रश्नांची थोडक्यात उत्तरे लिहा.**

1. प्राचीन भारतीय इतिहासाची लिखित साधने स्पष्ट करा.
2. प्राचीन भारताच्या इतिहासाची पुरातत्वीय / अलिखित साधने स्पष्ट करा.
3. प्राचीन भारताच्या इतिहासावर प्रकाश टाकणाऱ्या परकीय प्रवासी वृत्तांताचे वर्णन करा.
4. प्राचीन भारताच्या इतिहासाबाबतचा साम्राज्यवादी दृष्टिकोनाची मीमांसा करा.